भारतीय रिझर्व्ह बँक

**RESERVE BANK OF INDIA**

www.rbi.org.in

**आरबीआय/डीबीआर/2015-16/18**
**महानिर्देश डीबीआर.एएमएल.बीसी.क्र.81/14.01.001/2015-16**

फेब्रुवारी 25, 2016
(एप्रिल 20, 2020 रोजी अद्यावत केलेले)
(एप्रिल 01, 2020 रोजी अद्यावत केलेले)
(जानेवारी 9, 2020 रोजी अद्यावत केलेले)
(ऑगस्ट 9, 2019 रोजी अद्यावत केलेले)
(मे 29, 2019 रोजी अद्यावत केलेले)

**महानिर्देश - तुमचा ग्राहक जाणा (केवायसी) निर्देश, 2016**

भारत सरकारने अधिसूचित केलेल्या व भारत सरकारने वेळोवेळी सुधारित केलेल्या, प्रिव्हेंशन ऑफ मनी लाँडरिंग अधिनियम, 2002 व प्रिव्हेंशन ऑफ मनी लाँडरिंग (रेकॉर्ड ठेवणे) नियम, 2005 च्या तरतुदीनुसार, विनियमित संस्थांना (आरई), खाते आधारित संबंध स्थापन करताना किंवा अन्यथा एखादा व्यवहार करतेवेळी ग्राहक ओळखीच्या काही रीतींचे अनुसरण करुन त्यांच्या व्यवहारांवर देखरेख ठेवणे आवश्यक आहे. [1]अशा सुधारणांनुसार दिलेल्या कार्यकारी सूचनांसह, आरईंनी, उपनिर्दिष्ट अधिनियम व नियमांच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य ती पाऊले उचलावीत.

(2) त्यानुसार, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 चे कलम 35 अ, बँकिंग विनियामक अधिनियम (एएसीएस), 1949 च्या कलम 56 सह वाचित, प्रिव्हेंशन ऑफ मनी लाँडरिंग (रेकॉर्ड ठेवणे) नियम, 2005 चा नियम 9 (14) आणि ह्याबाबत रिझर्व्ह बँकेला सहाय्य करणारे इतर कायदे ह्यांनी दिलेल्या अधिकारांचा वापर करुन, आणि जनतेच्या हितासाठी असे करणे आवश्यक असल्याबाबत तिचे समाधान झाले असल्याने, भारतीय रिझर्व्ह बँक येथे पुढीलप्रमाणे विहित केलेले निर्देश देत आहे.

## प्रकरण-1

## प्रारंभिक

### (1) लघु शीर्षक व सुरुवात

(अ) ह्या निर्देशांना, भारतीय रिझर्व्ह बँक, तुमचा ग्राहक जाणा (केवायसी) निर्देश, 2016 म्हटले जाईल.

(ब) हे निर्देश भारतीय रिझर्व्ह बँकेच्या प्राधिकृत वेबसाईटवर टाकल्या गेल्याच्या दिवसापासून जारी होतील.

### (2) लागु असणे

(अ) ह्या निर्देशांच्या तरतुदी, अन्यथा खास निर्देशित केल्या नसल्यास, खालील 3 (ब)(13) मध्ये खास व्याख्या केल्या गेलेल्या, भारतीय रिझर्व्ह बँकेकडून विनियमित केल्या गेलेल्या प्रत्येक संस्थेला लागु असतील.

(ब) हे निर्देश, विदेशात असलेल्या आरईंच्या शाखा व बहुमताने मालकी असलेल्या सहाय्यक संस्थांना, यजमान देशातील स्थानिक संस्थांच्या विपरीत नसल्यास लागु असतील - मात्र त्याबाबत पुढील अटी आहेत :-

(1) जेथे लागु असलेले कायदे व विनियम, ह्या मार्गदर्शकांची अंमलबजावणी करण्यास मनाई करत असतील तेथे ती बाब भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नजरेस आणली जावी.

(2) भारतीय रिझर्व्ह बँकेने व यजमान देशातील विनियामक ह्यांनी विहित केलेल्या प्रमाणांमध्ये तफावत असल्यास, आरईंच्या शाखा/सहाय्यक संस्थांनी त्या दोन्ही मधील अधिक कडक विनियम स्वीकारावेत.

(3) विदेशात सुसंस्थापित झालेल्या बँकेच्या शाखा/सहाय्यक संस्था ह्या दोन्हीमधील, म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँक व यजमान देशातील विनियामक ह्यांनी विहित केलेल्या मधील, अधिक कडक विनियम स्वीकारु शकतात.

मात्र हा नियम, प्रकरण 4 मधील विभाग/कलम 23 मध्ये संदर्भित केलेल्या “छोट्या खात्यांना” लागु नसेल.

### (3) व्याख्या

ह्या निर्देशांमध्ये, अन्यथा संदर्भ नसल्यास ह्यामधील संज्ञांचा अर्थ त्यांना खाली दिलेल्या अर्थाप्रमाणे असेल.

(अ) प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉंडरिंग अधिनियम, 2002 व प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉंडरिंग (रेकॉर्ड ठेवणे) नियम, 2005 अनुसार अर्थ असलेल्या संज्ञा :-

(1) [2]“आधार क्रमांक” चा अर्थ, आधार (टारगेटेड डिलिव्हरी ऑफ फायनान्शियल अँड अदर सबसिडीज् अँड सर्व्हिसेस) अधिनियम, 2016 (2016 चा 18) च्या कलम 2 च्या खंड (अ) मध्ये त्याला देण्यात आलेल्या अर्थाप्रमाणे असेल.

(2) “अधिनियम” व “नियम” म्हणजे, प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉंडरिंग अधिनियम, 2002 आणि प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉंडरिंग (रेकॉर्ड ठेवणे) नियम, 2005 व त्यातील बदल/सुधारणा असे अनुक्रमे असेल.

(3) [3]आधार अधिप्रमाणकाच्या संदर्भात “अधिप्रमाणात” म्हणजे, आधार (टारगेटेड डिलिव्हरी ऑफ फायनान्शियल अँड अदर सबसिडीज् बेनिफीट्स अँड सर्व्हिसेस) अधिनियम, 2016 च्या कलम 2 च्या पोटकलम (क) खाली व्याख्या केलेली प्रक्रिया.

**(4) लाभार्थी मालक (बीओ).**

(अ) जेथे **ग्राहक ही एक कंपनी** असेल/आहे तेथे लाभार्थी मालक म्हणजे, ती/त्या नैसर्गिक व्यक्ती, जिचे/ज्यांचे एकरुपाने किंवा एकत्रितपणे किंवा एका किंवा अधिक कायदेशीर व्यक्तींच्या मार्फत नियंत्रक मालकी हितसंबंध आहेत किंवा जी/ज्या इतर प्रकारे नियंत्रण ठेवतात. स्पष्टीकरण - ह्या पोट-खंडासाठी -

(1) “नियंत्रक मालकी हितसंबंध” म्हणजे, कंपनीच्या शेअर्स किंवा भांडवल किंवा नफ्यामध्ये 25% पेक्षा अधिक मालकी/हक्क असणे.

(2) “नियंत्रण” ह्या संज्ञेत, संचालकांची बहुसंख्येने नेमणुक करण्याचा, किंवा त्यांचे भागधारण किंवा व्यवस्थापन हक्क किंवा भागधारक करार किंवा मत देण्याचे करार ह्यांच्या आधारावर, कंपनीच्या व्यवस्थापनावर किंवा धोरण निर्णयांवर नियंत्रण ठेवणे.

(ब) जेथे **ग्राहक ही एक भागीदारी कंपनी**/संस्था आहे तेथे, लाभार्थी मालक म्हणजे, ती/त्या नैसर्गिक व्यक्ती की जिला/ज्यांना एकट्याने किंवा एकत्रित म्हणजे काम करत असताना किंवा एक किंवा अधिक कायदेशीर व्यक्तींमार्फत, त्या व्यक्तीच्या इनकॉर्पोरिटेड नसलेला संघ, किंवा बोर्डाची मालमत्ता किंवा भांडवल किंवा नफा ह्यात 15% पेक्षा अधिक मालकी/हक्क असतो.

(क) जेथे **ग्राहक हा एक अनइनकॉर्पोरिटेड संघ किंवा व्यक्तीची संस्था (बॉडी)** आहे तेथे, लाभार्थी मालक हा/हे, एकट्याने किंवा एकत्रपणे किंवा एक किंवा अधिक न्यायिक व्यक्तींमार्फत कार्य करणारा/करणारे नैसर्गिक व्यक्ती की जिचे/ज्यांचे, त्या अनइनकॉर्पोरिटेड संघ किंवा व्यक्तींची संस्था ह्यांच्या मालमत्तेच्या किंवा भांडवलाच्या किंवा फायद्याच्या 15 टक्क्यांपेक्षा जास्त भागावर मालकी/अधिकार आहे.

स्पष्टीकरण - “व्यक्तींचा गट” ह्या संज्ञेत सोसायट्यांचा समावेश आहे. वरील अ, ब किंवा क खाली एखादी व्यक्ती येत नसल्यास, लाभार्थी मालक म्हणजे, संबंधित नैसर्गिक व्यक्ती की जिने वरिष्ठ व्यवस्थापकीय अधिका-याचे पद धारण केले आहे.

(ड) जेथे ग्राहक हा **ट्रस्ट** आहे तेथे, लाभार्थी मालकांची ओळख ह्यात, त्या ट्रस्टचा ऑथर, ट्रस्टी, ट्रस्टमध्ये 15% पेक्षा अधिक हितसंबंध असलेले लाभार्थी किंवा नियंत्रणाच्या एका साखळी/मालिकेद्वारा किंवा मालकीने, त्या ट्रस्टवर अंतिम परिणामकारक नियंत्रण ठेवणारी अन्य कोणतीही नैसर्गिक व्यक्ती समाविष्ट असेल.

(5) [4]"प्रमाणित प्रत" आरईकडून प्रमाणित प्रत मिळविणे म्हणजे, जेथे ऑफलाईन सत्यांकन/पडताळणी करता येत नाही किंवा ग्राहकाने दिलेले वैध प्राधिकृत कागदपत्र मूळ कागदपत्रांशी ताडून पाहता येत नाहीत, तेथे, आधार क्रमांक असल्याच्या पुराव्याच्या प्रतींची तुलना/पडताळणी करुन, ह्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार, आरईच्या प्राधिकृत अधिका-याकडून ती त्या प्रतीवर रेकॉर्ड करणे.

मात्र, अनिवासी भारतीय (एनआरआय) व भारतीय वंशाचे लोक (पीआयओ) ह्या विदेशीमुद्रा व्यवस्थापन (ठेवी) विनियम, 2016 (फेमा 5 (आर)) मध्ये व्याख्या केलेल्या व्यक्तींबाबत, पर्यायाने, पुढीलपैकी कोणीही एकाने प्रमाणित केलेली। मूळ प्रमाणित प्रत घेतली जावी.

- भारतात पंजीकृत झालेल्या अनुसूचित वाणिज्य बँकांच्या विदेशी शाखेतील प्राधिकृत अधिकारी.
- भारतीय बँकांचे व्यवहार संबंध असलेल्या विदेशी बँकांच्या शाखा.
- विदेशातील नोटरी पब्लिक.
- फौजदारी दंडाधिकारी.
- न्यायाधीश
- ती भारतीय व्यक्ती राहत असलेल्या देशातील भारतीय वकिलात/कॉनसुलेट जनरल.

(6) "कॆंद्रीय केवायसी रेकॉर्ड्स" रजिस्ट्री (सीकेवायसीआर) म्हणजे, एखाद्या ग्राहकाचे डिजिटल स्वरुपातील केवायसी रेकॉर्ड मिळविणे, दाखवणे व सुरक्षित ठेवणे ह्यासाठी ह्या नियमांच्या नियम 2 (1) खाली व्याख्या केलेली संस्था.

(7) "नेमलेला संचालक" म्हणजे, पीएमएल अधिनियमाचे प्रकरण 4 व हे नियम ह्याखाली जारी केलेल्या दायित्वांचे सर्वसमावेशक अनुपालन होण्याची खात्री करण्यासाठी आरईने नेमलेली व्यक्ती. ह्यात पुढील व्यक्ती समाविष्ट आहेत.

(अ) ती आरई एक कंपनी असल्यास, तिच्या संचालक मंडळाने प्राधिकृत केलेला व्यवस्थापकीय संचालक किंवा पूर्णवेळ संचालक.

(ब) आरई एक भागीदारी कंपनी असल्यास तिचा व्यवस्थापकीय भागीदार.

(क) आरई ही एक मालकी संस्था असल्यास तिचा मालक.

(ड) आरई एक ट्रस्ट असल्यास तिचा व्यवस्थापकीय ट्रस्टी.

(ई) आरई हा एक इनकॉर्पोरेट न झालेला व्यक्तींचा संघ किंवा गट असल्यास, त्या आरईचा कारभार सांभाळणारी व्यक्ती आणि

(फ) सहकारी बँका व प्रादेशिक ग्रामीण बँकांबाबत, "नेमलेला संचालक" म्हणून नेमण्यात आलेली, वरिष्ठ व्यवस्थापनात पद असलेली किंवा सममूल्य/समस्थानी व्यक्ती.

स्पष्टीकरण - ह्या खंडासाठी, "व्यवस्थापकीय संचालक" व "पूर्ण वेळ संचालक" ह्या संज्ञांचा अर्थ, कंपनीज् ॲक्ट 2013 मध्ये त्यांना देण्यात आलेल्या अर्थाप्रमाणेच असेल.

(8) [5]“डिजिटल केवायसी” म्हणजे, जेथे ऑफलाईन पडताळणी करता येत नाही. ह्या अधिवेशनात दिल्याप्रमाणे, आरईच्या प्राधिकृत अधिका-याने ग्राहकाचा प्रत्यक्ष फोटो, त्या ठिकाणाच्या अक्षांक्ष रेखांशासह घेणे व अधिकृत वैध कागदपत्र घेणे किंवा आधार असल्याचा पुरावा घेणे.

(9) [6]“डिजिटल सही” चा अर्थ, माहिती तंत्रज्ञान अधिनियम 2000 (2000 चा 21) च्या कलम (2) च्या पोटकलम (1) च्या खंड (ब) मध्ये तिला दिलेल्या अर्थाप्रमाणे असेल.

(10) [7]“सममूल्य ई डॉक्युमेंट” म्हणजे, तंत्रज्ञान (डिजिटल लॉकर सुविधा उपलब्ध करुन देण्यास मध्यस्थांकडून माहितीचे जतन व सांभाळ) नियम, 2016 च्या नियम 9 अन्वये, असे डॉक्युमेंट देणा-या प्राधिकरणाने दिलेल्या व ग्राहकाच्या डिजिटल लॉकरला दिलेल्या कागदपत्रांसह, त्याच्या वैध डिजिटल सहीसह दिलेल्या डॉक्युमेंटचे इलेक्ट्रॉनिक सममूल्य.

(11) [8]“तुमचा ग्राहक जाणा (केवायसी) आयडेंटिफायर” म्हणजे, केंद्रीय केवायसी रेकॉर्डस रजिस्ट्रीने एखाद्या ग्राहकाला दिलेला एकमेव क्रमांक किंवा संकेत.

(12) “विना नफा संस्था” (एनपीओ) म्हणजे, सोसायटीज पंजीकरण अधिनियम 1860 खाली, एक ट्रस्ट किंवा एक सोसायटी म्हणून पंजीकृत झालेली संस्था, किंवा कंपनीज अधिनियम 2013 खाली पंजीकृत झालेले त्यासमान राज्य लेजिस्लेशन किंवा कंपनी.

(13) “अधिकृततेने वैध डॉक्युमेंट” (ओव्हीडी) म्हणजे, पासपोर्ट, वाहन चालक परवाना, आधार क्रमांक असल्याचा [9] पुरावा, भारतीय निवडणुक आयोगाने दिलेले मतदार ओळख कार्ड, नरेगाने दिलेले व राज्य सरकारच्या अधिका-याची सही असलेले जॉब कार्ड आणि नाव व पत्ता हयांचा तपशील असलेले, राष्ट्रीय लोकसंख्या रजिस्ट्रर्ने दिलेले पद. मात्र,

(अ) एखाद्या ग्राहकाने आधार क्रमांक असल्याचा पुरावा, ओव्हीडी म्हणून सादर केल्यास, तो त्याने, युनिक आयडेंटिफिकेशन ऑथोरिटी ऑफ इंडियाने दिलेल्या स्वरुपात सादर करावा.

(ब) [10] जेथे ग्राहकाने दिलेल्या ओव्हीडीमध्ये अद्यावत पत्ता नसेल तेथे, पत्त्याचा पुरावा म्हणून, पुढील कागदपत्रे किंवा त्यांचे सममूल्य ई कागदपत्र ओव्हीडी म्हणून समजले जातील.

(1) कोणत्याही सेवादात्याने (वीज, टेलिफोन, पोस्ट पेड मोबाईल फोन, पाईप गॅस, पाणी देयक) दिलेले, दोने महिन्यांपेक्षा जुने नसलेले देयक.

2) मालमत्ता किंवा नगरपालिकेच्या कर दिल्याच्या पावत्या.

(3) सरकारी खात्यांनी किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांनी सेवानिवृत्त कर्मचा-यांना दिलेली व त्यात पत्ता असलेली पेन्शन किंवा फॅमिली पेन्शन ऑर्डर (पीपीओ).

(4) राज्य सरकार किंवा केंद्र सरकारचे विभाग, वैधानिक किंवा विनियामक संस्था, सार्वजनिक क्षेत्रावरील उपक्रम, अनुसूचित वाणिज्य बँका, वित्तीय संस्था व सूचिबध्द कंपन्यांनी दिलेले निवास - वाटपाचे पत्र आणि अधिकृत निवासस्थान दिल्याबाबत अशा मालकांबरोबर केलेले लीव्ह-लायसेन्स करार.

(क) वर 'ब' मध्ये दिलेली कागदपत्रे सादर केल्यापासून तीन महिन्यांच्या आत, विद्‌यमान पत्ता असलेले ओव्हीडी ग्राहकाने सादर करावे.

(ड) एखाद्‌या विदेशी व्यक्तीने सादर केलेल्या ओव्हीडीमध्ये त्याचा तपशील नसल्यास, अशा ठिकाणी, विदेशी न्यायिक प्राधिकरणांच्या सरकारी विभागाने दिलेली कागदपत्रे, आणि भारतामधील विदेशी वकिलात किंवा अभियान ह्यांनी दिलेले पत्र, पत्त्याचा पुरावा म्हणून स्वीकारले जाईल.

स्पष्टीकरण :- ह्या खंडासाठी, ते कागदपत्र दिल्यानंतर नावामध्ये बदल झाला असला तरीही ते कागदपत्र ओव्हीडी म्हणून समजले जातील. मात्र, त्याप्रमाणेच नावात बदल झाला असल्याचे निर्देशित करणारे, राज्य सरकारने दिलेले विवाह प्रमाणपत्र किंवा राजपत्र अधिसूचना पुरावा म्हणून देण्यात यावी.

(14) [11]"ऑफलाईन पडताळणी" चा अर्थ, त्या संज्ञेला, आधार (टारगेटेड डिलिव्हरी ऑफ फायनान्शियल अँड अदर सबसिडीज्, बेनिफीट्स अँड सर्व्हिसेस) अधिनियम, 2016 (2016 चा 18) च्या कलम 2 मधील खंड (पीए) मध्ये तिला देण्यात आलेल्या अर्थाप्रमाणे असेल.

(15) "व्यक्ती" चा अर्थ तिला ह्या अधिनियमात दिलेल्या अर्थाप्रमाणेच असेल व त्यात,

(अ) वैयक्तिक व्यक्ती,
(ब) हिंदु अविभक्त कुटुंब
(क) कंपनी
(ड) संस्था (फर्म)
(ई) इनकॉर्पोरेट झाली असो किंवा नसो - व्यक्तीचा संघ किंवा व्यक्तींचा गट
(फ) वरील व्यक्तीत (अ ते ई) न बसणारी प्रत्येक कृत्रिम कायदेशीर व्यक्ती आणि
(ग) वरीलपैकी (अ ते फ) कोणत्याही व्यक्तीच्या मालकीची किंवा नियंत्रित केलेली कोणतीही एजन्सी, कार्यालय किंवा शाखा ह्यांचा समावेश असेल.

(16) "प्रधान अधिकारी" म्हणजे, आरईने नेमलेला, ह्या नियमांमधील नियम 8 अनुसार, माहिती देण्यास जबाबदार असलेला अधिकारी.

(17) "संशयास्पद व्यवहार" म्हणजे, खाली व्याख्या केल्यानुसार, (रोख रकमेत केला असो किंवा नसो, प्रयत्न केलेल्या व्यवहारासह) केलेला "व्यवहार", की जो विश्वासाने काम करणा-या व्यक्तीमध्ये,

(अ) त्या व्यवहाराचे मूल्य कितीही असले तरी, ह्या अधिनियमाच्या शेड्युलमध्ये विहित केल्यानुसार, त्या व्यवहारात गुन्हेगारीचे उत्पन्न असू शकते अशी शंका निर्माण करु शकतो किंवा

(ब) असामान्य परिस्थितीत किंवा असमर्थनीय गुंतागुंतीने केला असल्याचे दिसून येते किंवा

(क) त्याबाबत आर्थिक कारणमीमांसा किंवा खरा/चांगला हेतु दिसून येत नाही किंवा

(ड) त्यामुळे दहशतवाद संबंधित कार्यकृतींना अर्थसहाय्य होऊ शकत असल्याची शंका निर्माण होते.

स्पष्टीकरण :- दहशतवादासंबंधित कार्यकृतींना अर्थसहाय्य करण्याबाबतच्या व्यवहारांमध्ये, दहशतवादासाठी, दहशतवादी कृत्ये, ह्यासाठी किंवा दहशतवादी किंवा दहशतवादी संस्था किंवा दहशतवादाला वित्तसहाय्य करणारांनी किंवा तसे वित्तसहाय्य करण्याचा प्रयत्न करणारांनी वापरण्यात येत असल्याबाबत, संशय निर्माण करणा-या निधीचे व्यवहार.

(18) “छोटे खाते” म्हणजे, पीएमएल नियम 2005 च्या पोटनियम (5) अनुसार उघडलेले बचत खाते. छोटे खाते चालविण्याबाबत व ह्यावरील नियंत्रणे, विभाग 23 मध्ये विहित केली आहेत.

(19) “व्यवहार” म्हणजे, खरेदी, विक्री, कर्ज, प्लेज, देणगी, हस्तांतरण, डिलिव्हरी किंवा त्याची व्यवस्था आणि त्यात,

(अ) खाते उघडणे

(ब) रोखीने किंवा चेकने, कोणत्याही मुद्रेमधील निधीच्या ठेवी, निकासी, विनिमय किंवा हस्तांतरण, पेमेंट ऑर्डर किंवा इतर संलेख किंवा इलेक्ट्रॉनिक किंवा कोणत्याही अप्रत्यक्ष रितीने करणे समाविष्ट आहेत.

(क) सेफ्टी डिपॉझिट बॉक्स किंवा सेफ डिपॉझिटच्या अन्य कोणत्याही स्वरुपाचा उपयोग करणे.

(ड) कोणतेही विश्वास अधिष्ठित संबंध ठेवणे.

(ई) कोणत्याही कंत्राटाबाबत किंवा इतर कायदेशीर दायित्वाबाबत स्वीकारलेले किंवा दिलेले अंशतः किंवा संपूर्ण प्रदान किंवा

(फ) एखादी कायदेशीर व्यक्ती किंवा कायदेशीर व्यवस्था स्थापन करणे किंवा निर्माण करणे.

(20) [12] “व्हिडियो आधारित ग्राहक ओळख प्रक्रिया (व्ही - सीआयपी)” :- आरईच्या अधिका-याकडून, ग्राहकाच्या सीडीडी साठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांसह, ओळख पटविण्याची माहिती मिळविण्यासाठी, सलग, सुरक्षित, रियल टाईम, सहमती आधारित असा ऑडियो व्हिच्युल संवाद ग्राहकाबरोबर केलेली ग्राहक ओळख पटविण्यासाठीची आणि ग्राहकाने दिलेल्या माहितीची सत्यता पडताळण्याची एक रीत. ह्या महानिर्देशांसाठी ही प्रक्रिया समोरासमोर केली असल्याचे समजले जाईल.

(ब) अन्यथा संदर्भ नसल्यास, ह्या निर्देशांमधील संज्ञाचे अर्थ, त्यांना खाली दिल्यानुसार असतील.

(1)“सामान्य अहवाल प्रमाणे” (सीआरएस) म्हणजे, म्युच्युल ॲडमिनीस्ट्रेटिव असिस्टन्स इन टॅक्स मॅटर्स वरील अधिवेशनाच्या आर्टिकल 6 वर आधारित, माहितीची आपोआप अदलाबदल करण्यासाठी स्वाक्षरी केलेल्या बहुपक्षीय कराराची अंमलबजावणी निश्चित केलेली प्रमाणे कळविणे.

(2) “ग्राहक” म्हणजे, एखाद्या विनियमित संस्थे (आरई) बरोबर वित्तीय व्यवहार करणारी किंवा कार्यकृती करणारी व्यक्ती आणि ह्यात, तो व्यवहार किंवा कार्यकृती करणारी व्यक्ती जिच्या वतीने तो करत आहे ती व्यक्तीही समाविष्ट आहे.

(3) “वॉक इन ग्राहक” म्हणजे, आरई बरोबर खाते आधारित संबंध नसलेली परंतु आरई बरोबर व्यवहार करणारी व्यक्ती.

(4) [13]“कस्टमर ड्यु डिलीजन्स (सीडीडी)” म्हणजे, ग्राहक व लाभार्थी मालक ह्यांची ओळख पटविणे व पडताळणी करणे.

(5) “ग्राहक ओळख” म्हणजे, सीडीडीची प्रक्रिया करणे.

(6) फॅटका - एफएटीसीए - म्हणजे अमेरिकेच्या संयुक्त संस्थानाचा (युएसए) विदेशी खाते कर अनुपालन अधिनियम, ज्यानुसार, युएस करदात्यांनी ठेवलेली वित्तीय खाती किंवा युएस करदात्यांचा लक्षणीय मालकी हितसंबंध असलेल्या विदेशी संस्था कळविणे, विदेशी संस्थांसाठी आवश्यक असते.

(7) “आयजीए” म्हणजे, आंतरराष्ट्रीय कर अनुपालन सुधारण्यासाठी आणि युएसएचा फॅटकाची अंमलबजावणी करण्यासाठी, भारत सरकार व युएसए ह्यामधील आंतर-सरकार करार.

(8) “केवायसी टेंप्लेट्स” म्हणजे, व्यक्ती आणि कायदेशीर संस्थांसाठी, सीकेवायसीआर ला केवायसी माहितीची पडताळणी करण्यासाठी व कळविण्यासाठी तयार केलेल्या टेंप्लेट्स.

(9) “नॉन फेस टु फेस (समोरासमोर न येणारे) ग्राहक” म्हणजे, आरईच्या शाखा/कार्यालयांमध्ये न जाता व आरईच्या अधिका-यांना न भेटताही खाती उघडणारे ग्राहक.

(10) “ऑन गोईंग (सततचे) ड्यु डिलिजन्स” म्हणजे, ग्राहकाची रुपरेषा व निधीचा स्त्रोत ह्यानुसारच खात्यातील व्यवहार होत असल्याची खात्री करण्यासाठी, खात्यातील व्यवहारांवर नियमित देखरेख ठेवणे.

(11) “नियतकालिक अद्यावतीकरण” म्हणजे, सीडीडी प्रक्रियेखाली गोळा केलेले कागदपत्र, माहिती किंवा डेटा, रिझर्व्ह बँकेने विहित केलेल्या कालावधीनुसार पुनरावलोकन करुन, अद्यावत व विषयाला धरुन ठेवण्याची खात्री करणे.

(12) “राजकीयदृष्ट्या सक्रिय असलेल्या व्यक्ती” (पीईपी) म्हणजे, विदेशामध्ये महत्त्वाच्या सार्वजनिक समारंभात भाग घेण्याची जबाबदारी सोपविलेल्या व्यक्ती. उदा. - राज्ये/सरकारे ह्यांचे प्रमुख, वरिष्ठ राजकारणी व्यक्ती, वरिष्ठ सरकारी/न्यायिक/लष्करी अधिकारी, राज्याच्या मालकीच्या निगमांचे वरिष्ठ कार्यकारी अधिकारी, महत्त्वाच्या राजकीय पक्षांचे अधिकारी इत्यादि.

(13) “विनियमित संस्था” (आरई) म्हणजे,

(अ) सर्व अनुसूचित वाणिज्य बँका (एससीबी)/प्रादेशिक ग्रामीण बँका (आरआरबी)/स्थानिक क्षेत्रीय बँका (एलएबी)/सर्व प्राथमिक (नागरी) सहकारी बँका (युसीबी)/राज्य व मध्यवर्ती सहकारी बँका (एसटीसीबी/सीसीबी) आणि बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 22 खाली परवाना मिळालेली इतर कोणतीही संस्था - ह्या सर्वांना एक गट म्हणून “बँका” म्हटले जाईल.

(ब) अखिल भारतातील वित्तीय संस्था (एआयएफआय).

(क) सर्व बिगर बँकिंग वित्तीय कंपन्या (एनबीएफसी), संकीर्ण बिगर बँकिंग कंपन्या (एमएनबीसी), आणि रेसिड्युअरी बिगर बँकिंग कंपन्या (आरएनबीसी)

(ड) सर्व प्रदान प्रणाली देणारे (पीएसपी)/प्रणालीत भाग घेणारे (एसपी) आणि प्रिपेड संलेख देणारे (पीपीआय इश्युअर्स)

(ई) ह्या विनियामकाने विनियमित केलेल्या धन हस्तांतरण सेवा प्रणांलीचे (एमटीएसएस) एजंटांसह, सर्व प्राधिकृत व्यक्ती (एपी)

(14) “शेल बँक” म्हणजे, तिची प्रत्यक्ष उपस्थिती नसलेल्या देशात इनकॉर्पोरेट झालेली व कोणत्याही विनियमित वित्तीय गटाशी संलग्न नसलेली बँक.

(15) “वायर ट्रान्स्फर” म्हणजे, एखाद्या बँकेतील लाभार्थीला एखादी रक्कम उपलब्ध व्हावी ह्या हेतूने, एखाद्या बँकेच्या मार्फत, व्यवहार सुरु करणा-या व्यक्तीच्या (नैसर्गिक तसेच कायदेशीर) वतीने, इलेक्ट्रॉनिक पध्दतीने, थेट हस्तांतरण किंवा हस्तांतरणाच्या मालिकेमधून केलेला व्यवहार.

(16) “देशांतर्गत व सीमापार वायर ट्रान्स्फर” - व्यवहार सुरु करणारी बँक व लाभार्थी बँक ही तीच/एकच व्यक्ती असेल किंवा त्याच देशात असलेली वेगळी व्यक्ती असेल तेथे, असा व्यवहार हा देशांतर्गत वायर ट्रान्स्फर असतो आणि “सुरु करणारी बँक” किंवा “लाभार्थी बँक” निराळ्याच देशात असेल तेथे असा व्यवहार हा सीमापार वायर ट्रान्स्फर असतो.

(क) येथे व्याख्या केल्या नसल्यास, इतर सर्व संज्ञांचा अर्थ, बँकिंग विनियामक अधिनियम 1949, भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम 1935, प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉंडरिंग अधिनियम 2002. [14]आधार (टारगेटेड डिलिव्हरी ऑफ फायनान्शियल अँड अदर सबसिडीज, बेनिफिट्स अँड सर्व्हिसेस) अधिनियम, 2016 व त्याखाली केलेले विनियम, त्यामध्ये केलेले कोणतेही वैधानिक बदल किंवा त्याचे सुधारित अधिनियम किंवा व्यापारी संदर्भ (असेल त्यानुसार) ह्यात त्या संज्ञांना दिलेल्या अर्थाप्रमाणे असेल.

## प्रकरण 2

## सर्वसाधारण

(4) आरईंचे संचालक मंडळ किंवा संचालक मंडळाने तसा अधिकार दिलेली कोणतीही समिती ह्यांनी मंजुर केलेले तुमचा ग्राहक जाणा (केवायसी) धोरण ठेवण्यात आले असावे.

(5) ह्या केवायसी धोरणात पुढील चार महत्त्वाची तत्वे असतील.

(अ) ग्राहक स्वीकार धोरण
(ब) जोखीम व्यवस्थापन
क) ग्राहक ओळख कार्यरीती (सीआयपी) आणि
(ड) व्यवहारांवर देखरेख

**[15]5अ आरई कडून, मनी लॉंडरिंग व दहशतवादाला वित्त पुरवठ्याच्या जोखमीचे मूल्यांकन** :

अ) आरई, त्यांचे ग्राहक, देश किंवा भौगोलिक क्षेत्र, उत्पाद, सेवा, व्यवहार किंवा प्रदान वाहिन्या ह्यांच्यासाठी/ बाबत, मनी लॉंडरिंग व दहशतवादाला वित्तपुरवठा केल्या जाण्याच्या जोखमी कमी करण्यासाठीचे उपाय ओळखण्यासाठी त्यांचे मूल्यमापन करुन परिणामकारक उपाय योजण्यासाठी, नियतकालिकतेने, “मनी लॉंडरिंग /एमएल व दहशतवादाला वित्तपुरवठा( टीएफ) जोखीम मूल्यांकन” करत राहतील.

सर्वसमावेशक जोखमीचा स्तर व ती कमी करण्याचा प्रकार /रीत व तीचा स्तर ठरविण्यापूर्वी, ह्या मूल्यमापन प्रक्रियेत, सर्व प्रकारच्या संबंधित जोखीम घटकांचा विचार केला जावा. अंतर्गत जोखीम मूल्यमापन तयार करतांना, आरईने विनियामक / पर्यवेक्षक, आरईसह वेळोवेळी शेअर करु शकतील अशा, सर्वसमावेशक विभाग - विशिष्ट भेद्यतांचीही दखल आरईंनी घ्यावी.

ब) आरईंनी केलेले जोखमींचे मूल्यमापन सुयोग्य प्रकारे नोंदवून / लिहून ठेवले जावे आणि ते मूल्यमापन, त्या आरईचे स्वरुप, आकारमान, तिचे भौगोलिक अस्तित्व, तिच्या कार्यकृतींची गुंतागुंत/रचना इत्यादींशी जुळणारे असावे. ह्याशिवाय, जोखीम मूल्यमापनाची नियतकालिकता ही, त्या जोखीम मूल्यमापनाच्या परिणामांशी सुसंगत / जुळणारी व त्या आरईच्या संचालक मंडळाकडून ठरविली जावी. तथापि ह्या मूल्यमापनाचे वर्षातून किमान एकदा तरी पुनरावलोकन केले जावे.

क) ह्या मूल्यमापनाचे परिणाम, संचालक मंडळासमोर किंवा किंवा ह्या बाबत अधिकार देण्यात आलेल्या कोणत्याही समितीसमोर किंवा मंडळासमोर ठेवले जावेत. आणि ते सक्षम प्राधिकरणांना आणि स्वयं- विनियामक संस्थांना उपलब्ध असावेत.

ओळखण्यात आलेल्या जोखमींचे व्यवस्थापन व उपशमन करण्यासाठी आरईंनी जोखीम आधारित दृष्टीकोन / आरबीए लागु करावा व ह्याबाबत संचालक मंडळाने मंजूर केलेली धोरणे, नियंत्रणे व कार्यरीती ठेवल्या जाव्यात. ह्याशिवाय, आरई, ह्या नियंत्रणाच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवतील व जरुर पडल्यास ती वाढवतील.

**(6) नेमलेला संचालक**

(अ) 'नेमलेला (डेसिग्नेटेड) संचालक' म्हणजे, पीएमएल अधिनियमाच्या प्रकरण 4 खालील जारी केलेले नियम व दायित्वे ह्यांचे सर्वंकष अनुपालन होत असल्याची खात्री करण्यासाठी आरईने नेमलेली व्यक्ती.

(ब) ह्या नेमलेल्या संचालकाचे नाव, हुद्दा आणि पत्ता, एफआययु - आयएनडीला कळविण्यात यावा.

(क) कोणत्याही परिस्थितीत प्रधान अधिका-याला 'नेमलेला संचालक' केले जाऊ नये.

**(7) प्रधान अधिकारी**

(अ) कायदा/विनियम ह्यांच्याखाली आवश्यक असल्यानुसार, अनुपालन केले जाण्यास, व्यवहारांवर देखरेख ठेवण्यास आणि माहिती शेअर करण्यास प्रधान अधिकारी जबाबदार असेल.

(ब) प्रधान अधिका-याचे नाव, हुद्दा व पत्ता, एफआययु - आयएनडीला कळविण्यात येईल.

**8) केवायसी धोरणाचे अनुपालन**

(अ)) पुढील रितींमार्फत आरई केवायसी धोरणाच्या अनुपालनाची खात्री करुन घेतील.

(1) केवायसी अनुपालनासाठी 'वरिष्ठ व्यवस्थापन' नेमके कोण आहे ठरविणे.

(2) धोरणे व कार्यरीतींची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठीची जबाबदारी नेमून देणे.

(3) कायदेशीर व विनियामक आवश्यकतांसह आरईची धोरणे व कार्यरीती ह्यांच्या अनुपालनाचे स्वतंत्र मूल्यांकन.

(4) केवायसी/एएमएल धोरणे व कार्यरीतीच्या अनुपालनाची पडताळणी करण्यासाठी सप्तवर्ती/अंतर्गत लेखा परीक्षण प्रणाली.

(5) लेखा परीक्षण समितीला तिमाही लेखा परीक्षण व अनुपालनाच्या टीपा/माहिती सादर करणे.

(ब) आरईंनी खात्री करुन घ्यावी की, केवायसी नॉर्म्सचे अनुपालन केले असल्याचे/नसल्याचे निश्चित करण्याची कार्ये बाहेरच्या संस्था/व्यक्तींना दिलेली नाही.

**प्रकरण 3**

**ग्राहक स्वीकार धोरण**

**(9)** आरईंनी एक ग्राहक स्वीकार धोरण तयार करावे.

**(10)** ग्राहक स्वीकार धोरणात असलेल्या बाबी/पैलू ह्यांना बाधा न आणता आरईंनी खात्री करुन घ्यावी की, -

(अ) कोणतेही खाते अनामिक किंवा खोट्या नावाने बेनामी उघडले जाणार नाही.

(ब) ग्राहकाच्या असहकारामुळे किंवा ग्राहकाने दिलेल्या कागदपत्रांच्या/माहितीच्या अविश्वसनीयतेमुळे, सीडीडी उपाय लागु करण्यास आरई असमर्थ असल्यास कोणतेही खाते उघडले जाऊ नये.

(क) सीडीडी कार्यरीत पूर्ण केल्याशिवाय कोणतेही व्यवहार किंवा खाते आधारित संबंध ठेवले जाणार नाहीत.

(ड) खाते उघडतेवेळी केवायसी साठी व नियतकालिक अद्यावतीक त्यासाठी मागण्यात येणारी/मिळविण्याची माहिती विहित असावी.

(ई) खाते उघडले गेल्यानंतरची "ऐच्छिक"/अतिरिक्त माहिती, ग्राहकाची स्पष्ट सहमती घेऊनच घेतली जावी.

(फ) ही सीडीडी कार्यरीत आरई, युसीआयसी स्तरावर वापरतील. अशा प्रकारे, एखाद्या आरईच्या एखाद्या ग्राहकाने, त्याच आरईमध्ये आणखी एक खाते उघडतेवेळी पुनश्च सीडीडी करण्याची गरज नाही.

(ग) संयुक्त खाते उघडण्यासाठी, सर्व संयुक्त खातेदारांसाठी सीडीडी कार्यरीत अवलंबिली जावी.

(ह) दुस-या व्यक्तीच्या/संस्थेच्या वतीने काम करण्यास एखाद्या व्यक्तीला परवानगी देण्यात आली आहे अशी परिस्थिती स्पष्टपणे विहित केली जावी.

(आय) भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रसृत केलेल्या मंजुरी यादींमध्ये नाव असलेल्या, अन्य कोणत्याही व्यक्तीशी किंवा संस्थेशी ग्राहकाचे नाव जुळत नाही ह्याची खात्री केली जावी.

(ज) [16]जेथे परमनंट अकाऊंट क्रमांक (पॅन) मिळविला जातो तेथे, त्याची पडताळणी, तो क्रमांक देणा-या प्राधिकरणाच्या पडताळणी-सुविधेकडून केली जावी.

(के) [17] जेथे ग्राहकाकडून सममूल्य ई डॉक्युमेंट मिळविले जाते तेथे, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 (2000 चा 21) च्या तरतुदीनुसार आरईंनी डिजिटल सहीची पडताळणी करावी.

**(11)** ग्राहक स्वीकार धोरणाचे पर्यवसन, सर्व साधारण जनतेला व विशेषतः वित्तीय किंवा सामाजिक दृष्टीने लाभ न मिळालेल्या जनतेला, बँकिंग/वित्तीय सुविधा नाकारल्या जाण्यास होऊ नये.

## प्रकरण-4

## जोखीम व्यवस्थापन

**(12)** जोखीम व्यवस्थापनासाठी आरईंनी, पुढील बाबी समाविष्ट असलेला दृष्टिकोन ठेवावा.

(अ) आरईने केलेल्या जोखीम दृष्टिकोनाच्या आधाराने ग्राहकांचे वर्गीकरण, निम्न, मध्यम व उच्च जोखीम वर्गात केले जावे.

(ब) असे जोखीम वर्गीकरण पुढील घटकांवर आधारित केले जावे, जसे, ग्राहकाची ओळख, सामाजिक/वित्तीय दर्जा, व्यवसायाचे स्वरुप, आणि ग्राहकाचा व्यवसाय व त्याची व्यवसायाची जागा इत्यादि. ग्राहकाची ओळख विचारात घेतेवेळी, त्याने ओळखीसाठी दिलेल्या कागदपत्रांची पडताळणी, ती देणा-या प्राधिकरणांकडून ऑनलाईन किंवा इतर सेवांद्वारा करता येण्याची क्षमताही विचारात घेतली जावी. - मात्र, दिसत असलेल्या जोखमीमधील ग्राहकांच्या निरनिराळ्या वर्गामधून गोळा केलेली माहिती ही अनाहूत नसावी व ते केवायसी धोरणात विहित केलेले असावे.

स्पष्टीकरण :- एफएटीएफ सार्वजनिक निवेदन, भारतीय बँक संघाने (आयबीए) केवायसी/एएमएलवर दिलेले अहवाल व मार्गदर्शक टीपा, आरबीआयने सर्व सहकारी बँकांकडे पाठविले. प्रस्तारित केलेल्या मार्गदर्शक टीपा इत्यादींचा उपयोगही जोखीम मूल्यांकनासाठी केला जावा.

## प्रकरण 5

## ग्राहक ओळख कार्यरीत (सीआयपी)

**(13)** आरईंनी पुढील बाबतीत, ग्राहकांची ओळख पटविणे आवश्यक आहे.

(अ) ग्राहकांबरोबर खाते आधारित संबंधाची सुरुवात.

(ब) बँकेचा खातेधारक नसलेल्या व्यक्तींसाठी, कोणताही आंतरराष्ट्रीय धन हस्तांतरण व्यवहार करतेवेळी

(क) बँकेने मिळविलेल्या ग्राहक ओळखी संबंधीच्या खरेपणाविषयी किंवा सुयोग्यतेविषयी शंका असल्यास

(ड) एजंट म्हणून तृतीय पक्षाचे उत्पाद विकणारे, स्वतःचे उत्पाद विकणारे, क्रेडिट कर्जांची थकबाकी प्रदान करणारे/प्रिपेड आणि पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक मूल्याची प्रिपेड/प्रवाही कार्डे किंवा अन्य कोणत्याही उत्पादांची विक्री करणारे.

(ई) संबंधित रक्कम रुपये पन्नास हजार किंवा त्यापेक्षा अधिक रकमेच्या व केवळ एकाच व्यवसायाने किंवा जोडणी दिसत येत असलेल्या व्यवहारांद्वारे, खाते नसलेल्या म्हणजे वॉक इन ग्राहकांसाठी व्यवहार केले जाणे.

(फ) पन्नास हजार रुपयांच्या मर्यादेखाली राहून एखादा ग्राहक (वॉक इन ग्राहक) जाणून बुजून एखादा व्यवहार, अनेक व्यवहारांच्या मालिकेतून करत आहे असे आरईंना दिसून येत असल्यास

(ग) खाते उघडताना ओळख मागितली जाणार नाही ह्याची आरईंनी खात्री करुन घ्यावी.

**(14)** खाते आधारित संबंध सुरु करतेवेळी ग्राहकांच्या ओळखीची पडताळणी करण्यासाठी, आरई, त्यांना तसे वाटल्यास, तृतीय पक्षाने केलेल्या ड्यु डिलिजन्सवर पुढील अटींवर अवलंबून राहू शकतात.

(अ) [18] ड्यु डिलिजन्सचे तृतीय पक्षाने, केलेल्या त्या ग्राहकाच्या ड्यु डिलिजन्सचे रेकॉर्ड किंवा माहिती, त्या तृतीय पक्षाकडून दोन दिवसांच्या आत किंवा केवायसी रेकॉर्डने रजिस्ट्रीकडून मिळालेले असावे.

(ब) ग्राहकाच्या ड्यु डिलिजन्स आवश्यकतासंबंधीचे इतर संबंधित कागदपत्र व ओळखीबाबतच्या माहितीच्या प्रती, विनंती केल्यावर, तृतीय पक्षाकडून विना विलंब मिळाल्या असल्याबाबत आरईंनी स्वतःचे सुयोग्य समाधान करुन घ्यावे.

(क) तृतीय पक्ष विनियमित, पर्यवेक्षणयुक्त किंवा देखरेख ठेवण्यात आलेला असावा आणि पीएमएल अधिका-याखालील आवश्यकता व दायित्वे ह्यांच्या आवश्यकतांनुसार, ग्राहकांचे ड्यु डिलिजन्स व अभिलेख ठेवण्याच्या आवश्यकतांचे अनुपालन करण्यासाठीचे उपाय/सुविधा असलेला असावा.

(ड) असा तृतीय पक्ष, उच्च जोखीम म्हणून मूल्यांकन केलेल्या देशात किंवा अधिकार क्षेत्रात नसावा.

(ई) ग्राहकाचे ड्यु डिलिजन्स करण्याची व लागु असल्यानुसार अधिकतर ड्यु डिलिजन्स करण्याची अंतिम जबाबदारी आरईचीच असेल.

## प्रकरण 6

## ग्राहक ड्यु डिलिजन्स (सीडीडी) कार्यरीत

## विभाग 1 व्यक्तींच्या बाबतीत ग्राहक ड्यु डिलिजन्स कार्यरीत

**15**.[19] खोडण्यात आली आहे.

**16**.[20] - खाते आधारित संबंध सुरु करतेवेळी किंवा लाभार्थी मालक असलेल्या व्यक्ती, प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता किंवा कोणत्याही कायदेशीर संस्थेशी संबंधित मुखत्यारनामा धारण करणा-यांबरोबर व्यवहार करतेवेळी सीडीडी करत असताना आरईंनी पुढील कागदपत्रे मिळवावीत.

(अ) आधार क्रमांक - जेथे

(1) आधार (टारगेटेड डिलिव्हरी ऑफ फायनान्शियल अँड अदर सबसिडीज, बेनिफिट्स अँड सर्व्हिसेस) अधिनियम 2016 च्या (2016 चा 18) कलम 7 खाली अधिसूचित करण्यात आलेल्या कोणत्याही लाभ किंवा सबसिडी मिळविण्यास तो इच्छुक आहे किंवा

(2) त्याचा आधार क्रमांक बँकेकडे किंवा पीएमएल अधिनियमाच्या कलम 11 च्या पोटकलम (1) च्या प्रथम तरतुदीखाली अधिसूचित केलेल्या कोणत्याही आरईकडे सादर करण्याचे त्याने स्वेच्छेने ठरविले आहे किंवा

(अअ) ऑफलाईन पडताळणी करता येऊ शकते तेथे आधार क्रमांक असल्याचा पुरावा किंवा

(अब) ऑफलाईन पडताळणी करता येऊ शकत नाही तेथे आधार क्रमांक, पुरावा किंवा त्याची ओळख व पत्याचा तपशील असलेले कोणतेही ओव्हीडी किंवा त्याचे सममूल्य ई डॉक्युमेंट आणि

(ब) आय कर नियमावली 1962 मध्ये व्याख्या केल्यानुसार, परमनंट अकाऊंट क्रमांक किंवा त्याच्या सममूल्य डॉक्युमेंट किंवा फॉर्म क्र. 60 आणि

(क) आरईच्या आवश्यकतेनुसार, ग्राहकाच्या व्यवसायाचे स्वरुप व त्याचा वित्तीय दर्जा हयासह इतर कागदपत्रे किंवा त्यांची सममूल्य ई डॉक्युमेंट्स.

मात्र, जेथे ग्राहकाचे एखाद्या बँकेकडे किंवा पीएचएल अधिनियमाच्या कलम 11 अ च्या पोटकलम (1) च्या प्रथम तरतुदीखाली अधिसूचित असलेल्या आरईकडे, वरील खंड (अ) खाली आधार क्रमांक सादर केला असल्यास, ती बँक किंवा आरई, युनिक आयडेंटिफिकेशन ऑथोरिटी ऑफ इंडियाने दिलेल्या ई केवायसी ऑथेंटिकेशन सुविधेचा वापर करुन ग्राहकाच्या आधार क्रमांकाचे सत्यांकन करील.

ह्याशिवाय, अशा बाबतीत, सेंट्रल आयडेंटिटीज डेटा डिपॉझिटरीमध्ये उपलब्ध असलेल्या ओळख-माहितीनुसार असलेल्या पत्त्यापेक्षा निराळा विद्यमान पत्ता देण्यास ग्राहक इच्छुक असल्यास, त्याने तशा अर्थाचे स्वयंघोषणापत्र आरईला द्यावे.

(2) वरील खंड (अअ) खालील आधार क्रमांक असल्याचा पुरावा, जेथे ऑफलाईन करता येणे शक्य आहे तेथे आरई, ऑफलाईन पडताळणी करील.

(3) कोणत्याही ओव्हीडीचे सममूल्य ई डॉक्युमेंट, माहिती तंत्रज्ञान अधिनियम 2000 (2000 चा 21) च्या तरतुदीनुसार, व त्याखाली देण्यात आलेल्या नियमांनुसार, आरई, डिजिटल स्वाक्षरीची पडताळणी करील व जोडपत्र 1 मध्ये विहित केल्यानुसार प्रत्यक्ष फोटो काढील.

(4) वरील खंड (अ ब) खालील कोणतेही ओव्हीडी किंवा आधार क्रमांक असल्याचा पुरावा - जेथे ऑफलाईन पडताळणी करता येत नसेल तेथे, जोडपत्र 1 खाली विहित केल्यानुसार, आरई, डिजिटल केवायसीद्वारे सत्यांकन करील.

मात्र, आरईच्या एखाद्या वर्गासाठी, सरकारने अधिसूचित केलेल्या तारखेच्या आत, अशा वर्गात असलेली आरई, डिजिटल केवायसी करण्याऐवजी, सममूल्य ई डॉक्युमेंट सादर केलेले नाही तेथे, आधार क्रमांक असल्याच्या पुराव्याची किंवा ओव्हीडीची प्रमाणित प्रत व अलिकडील फोटोग्राफ मिळवू शकते.

मात्र, ह्याशिवाय, दुखापत, आजारपण किंवा वृध्दत्वामुळे आलेले पंगुत्व किंवा अशा कारणांमुळे, आधार (टारगेटेड डिलिव्हरी ऑफ फायनान्शियल अँड अदर सबसिडीज बेनिफिट्स अँड सर्व्हिसेस) अधिनियम, 2016 च्या कलम 7 खाली अधिसूचित केलेल्या योजनांखालील कोणतेही लाभ किंवा सबसिडी मिळविण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तीसाठी, ई-केवायसी सत्यांकन करणे शक्य नसल्यास आरई, आधार क्रमांक मिळविण्याव्यतिरिक्त, शक्यतो ऑफलाईन सत्यांकन करुन, किंवा ग्राहकाकडून अन्य कोणत्याही ओव्हीडीची प्रमाणित प्रत किंवा सममूल्य ई डॉक्युमेंट मिळवून ओळखक्रिया पूर्ण करतील. अशा प्रकारचे सीडीडी, केवळ आरईच्या अधिका-याकडूनच केले जाईल आणि अशी अपवादात्मक हाताळणी, विभाग 8 मध्ये अपरिहार्य केल्यानुसार समवर्ती ऑफिसचा एक भाग समजला जाईल. अशा अपवादात्मक हाताळणीची प्रकरणे, केंद्रीकृत अपवाद डेटाबेस मध्ये रेकॉर्ड केल्याची खात्री आरईंनी करुन घ्यावी. ह्या डेटाबेसमध्ये, असा अपवाद करण्याची कारणे, ग्राहकाचा तपशील, अपवाद प्राधिकृत करणा-या अधिका-याचे नाव व असल्यास अतिरिक्त माहिती असेल. ह्या डेटाबेसची नियतकालिक तपासणी/ऑडिट आरईकडून केली जाईल आणि तो पर्यवेक्षणात्मक पुनरावलोकन करण्यासाठी उपलब्ध असेल.

स्पष्टीकरण - (1) जेथे ग्राहकाने, आधार क्रमांक दिला असलेला, आधार क्रमांक असल्याबाबतचा पुरावा सादर केला असेल, तेथे वरील तरतुद (1) अनुसार आधार क्रमांकाचे सत्यांकन करण्याची आवश्यकता नसल्यास, आरईने खात्री करुन घ्यावी की, अशा ग्राहकाने, त्या पुराव्यावरील आधार क्रमांक सुयोग्य रितीने झाकलेला/खोडलेला आहे.

स्पष्टीकरण 2 - बँकेचे अधिकारी/बिझिनेस कॉरेस्पॉडंट्स/बिझिनेस फॅसिलीटेटर्स ह्यांच्याकडून बायोमेट्रिक आधारित ई-केवायसी सत्यांकन केले जाऊ शकते.

स्पष्टीकरण 3 - आधारचा, आधार असल्याचा पुरावा इत्यादींचा उपयोग, आधार (टारगेटेड डिलिव्हरी ऑफ फायनान्शियल अँड अदर सबसिडीज बेनिफिट्स अँड सर्व्हिसेस) अधिनियम, 2016 व त्याखाली केलेले विनियम ह्यांच्या अनुसार असेल.

**(17)** समोरासमोर/प्रत्यक्ष हजर नसताना, ओटीपी आधारित ई-केवायसी वापरुन उघडलेल्या खात्यांना पुढील अटी लागु आहेत.

(1) ओटीपीद्वारा सत्यांकन करण्याबाबत ग्राहकाकडून तशी/नेमकी संमती मिळाली असावी. (2) ग्राहकाच्या सर्व ठेवी खात्यांमधील एकूण शिल्लक रु. एक लाखापेक्षा अधिक नसावी, ती शिल्लक वरील मर्यादेबाहेर असल्यास, खालील (5) मध्ये दिलेले सीडीडी पूर्ण होईपर्यंत ते खाते कार्यकारी असणार नाही.

(3) एक वित्तीय वर्षात, सर्व ठेवी खात्यातील क्रेडिट केलेली एकूण रक्कम रुपये दोन लाखांपेक्षा अधिक नसावी.

(4) कर्ज खात्यांच्या बाबत, केवळ मुदत कर्जेच मंजुर केली जावीत. एका वर्षात मंजुर केलेली मुदत कर्जे एकूण साठ हजार रुपयांपेक्षा अधिक नसावीत.

(5) ओटीपी आधारित ई-केवायसी वापरुन उघडण्यात आलेली ठेवी व कर्ज अशी दोन्हीही खाती, एक वर्षापेक्षा अधिक काळ चालू ठेवण्यात येणार नाहीत व ह्या कालावधीत विभाग 16 नुसार ओळख पटविली जावी.

(6) ठेव खात्यांच्या बाबतीत वरील कार्यरीत एक वर्षाच्या आत पूर्ण न केली गेल्यास, ती खाती त्वरित बंद केली जातील. कर्जखात्यांच्या बाबतीत, कोणतेही डेबिट करण्यास परवानगी नसेल.

(7) [21]समोरासमोर न येता, ओटीपी आधारित केवायसी वापरुन, अन्य कोणत्याही आरईकडे कोणतेही खाते उघडले नाही आणि उघडले जाणारही नाही अशा अर्थाचे घोषणापत्र ग्राहकाकडून घेतले जावे. ह्याशिवाय, सीकेसीवाय वर केवायसी माहिती अपलोड करतेवेळी आरईंनी स्पष्टपणे निर्देशित करावे की, अशी खाती ओटीपी आधारित केवायसी वापरुन उघडण्यात आली असून, इतर आरईंनी, समोरासमोर न येता, ओटीपी आधारित केवायसी वापरुन उघडलेल्या खात्यांच्या केवायसी माहितीच्या आधारावर खाती उघडू नयेत.

(8) वरील अटींचे अनुपालन होण्याची खात्री करुन घेण्यासाठी, अनुपालन न होणे/उल्लंघन ह्याबाबत तसा इशारा निर्माण करणा-या प्रणालीसह आरईंनी कडक देखरेख ठेवावी.

**(18)** [22] वैय्यक्तिक ग्राहकाबरोबर खाते आधारित संबंध स्थापन करण्यासाठी, आरई, त्याची सज्ञान सहमती मिळवून, त्या आरईच्या अधिका-याद्वारे प्रत्यक्ष व्ही-सीआयपी करु शकते व त्यासाठी पुढील अटींचे पालन केले जावे.

(1) व्ही-सीआयपी करणारा आरईचा अधिकारी, ओळखीसाठी आलेल्या ग्राहकाचा व्हिडियो रेकॉर्ड करील व त्याचा फोटोही घेईल व खाली दिलेली ओळख पटविण्याची माहिती मिळवील.

- बँका : ओळख पटविण्यासाठी बँका, ओटीपी आधारित ई-केवायसी सत्यांकन करु शकतात किंवा आधार ऑफलाईन पडताळणी करु शकतात.  ह्याशिवाय, व्ही-सीआयपीला साह्य करण्यासाठी, बँका, बिझिनेस कॉरेस्पॉडंट्सच्या (बीसी) सेवाही घेऊ शकतात.
- बँका सोडून इतर आरई :  ओळख पटविण्यासाठी केवळ आधारची ऑफलाईन पडताळणी करु शकतात.

(2) ग्राहकाने ई-पॅन दिले असल्याचे सोडून आरई ह्या प्रक्रियेमध्ये ग्राहकाने प्रदर्शित केलेल्या पॅन कार्डाची स्पष्ट प्रतिमा मिळवील.  कार्ड देणा-या प्राधिकरणाच्या डेटाबेसमधून पॅनच्या तपशीलाची पडताळणी केली जाईल.

(3) ग्राहक प्रत्यक्षात भारतामध्येच आहे ह्याची खात्री करुन घेण्यासाठी ग्राहकाच्या प्रत्यक्ष जागेचा फोटो काढला जाईल (जिओटॅगिंग)

(4) आरईचा अधिकारी खात्री करुन घेईल की, आधार/पॅन तपशील ह्यावरील ग्राहकाचा फोटो, व्ही-सीआयपी मधील ग्राहकाशी जुळणारा आहे आणि आधार/पॅनमधील ओळख तपशील ग्राहकाने दिलेल्या तपशीलाशी जुळणारा आहे.

(5) आरईचा अधिकारी खात्री करुन घेईल की, व्हिडियो प्रक्रियेतील संवादामधील प्रश्नांचा क्रम आणि/किंवा प्रकार वेगवेगळा असेल की ज्यामुळे तो संवाद पूर्वीच रेकॉर्ड केलेला नसून प्रत्यक्षातील असल्याचे स्थापित होईल.

(6) एक्सएमएल फाईल किंवा आधार सिक्युअर क्युआर कोडचा उपयोग करुन आधारची ऑफलाईन पडताळणी करण्याबाबत खात्री करुन घेतली जावी की, एक्सएमएल फाईल किंवा क्युआर कोड निर्माण करण्याची तारीख, व्ही-सीआयपी करण्याच्या तारखेच्या 3 दिवसांपेक्षा जुनी/आधीची नाही.

(7) ह्या प्रक्रियेच्या एकसंघतेची खात्री करुन घेण्यासाठी, व्ही-सीआयपीद्वारा उघडण्यात आलेली सर्व खाती, केवळ समावर्ती ऑडिट केल्यावरच कार्यकारी केली जावीत.

(8) आरईनी खात्री करुन घ्यावी की, ही प्रक्रिया अखंडित, प्रत्यक्ष वेळेतील, सुरक्षित, व ग्राहकाशी केलेल्या ऑडियो व्हिज्युअल संवादाचे एंड टु एंड एनक्रिप्टेशन केलेली आहे आणि ह्या संवादाचा दर्जा, ग्राहकाची निःशंकपणे ओळख पटविण्यासाठी योग्य आहे. विडंबन व इतर प्रकारचे फेरफार केले जाण्यापासून संरक्षण होण्यासाठी आरईंनी त्यातील 'जिंवतपणाच्या' चाचण्या कराव्यात.

(9) सुरक्षितता, दणकटपणा व एंड टु एंड एनक्रिप्टेशनची खात्री करुन घेण्यासाठी, व्ही-सीआयपी ॲप्लिकेशन वापरण्यापूर्वी, आरई, त्याचे सिक्युरिटी ऑडिट व वैधता तपासणी करतील.

(10) असा ऑडियो व्हिज्युअल संवाद, आरईच्या स्वतःच्याच कार्यक्षेत्रातून सुरु केला जावा - तृतीय पक्षीय सेवादात्याकडून (असल्यास) ही व्ही-सीआयपी प्रक्रिया, त्यासाठी खास प्रशिक्षित असलेल्या अधिका-यांद्वारे केली जावी. व्ही-सीआयपी करणा-या अधिका-याचा ॲक्टिविटी लॉग व त्याची विश्वासपत्रे (क्रेडेंशियल्स) जपून ठेवण्यात यावीत.

(11) आरईंनी खात्री करुन घ्यावी की, व्हिडियो रेकॉर्डिंग सुरक्षिततेने ठेवण्यात आले असून त्यावर तारीख व वेळेचा स्टँप मारण्यात आला आहे.

(12) ह्या प्रक्रियेच्या व ग्राहकाने दिलेल्या माहितीच्या एकात्मतेची खात्री करुन घेण्यासाठी, कृत्रिम बुध्दिमत्ता (एआय) व जुळणा-या तंत्रज्ञानांसह, आरईंना, उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानांची मदत घेण्यास प्रोत्साहन देण्यात येत आहे. तथापि, ग्राहकाची ओळख पटविण्याची जबाबदारी त्या आरईचीच असेल.

(13) कलम/विभाग 16 अनुसार आधार क्रमांक झाकण्याची किंवा खोडण्याची आरईंनी खात्री करावी.

(14) ही प्रक्रिया, बीसी वर दिल्यानुसार केवळ ग्राहक असलेल्या ठिकाणी (कस्टमर एंड) सुरु करु शकतात. व्ही-सीआयपीच्या दुस-या टोकाशी असलेला अधिकारी मात्र बँकेचा अधिकारीच असला पाहिजे. बीसीच्या सेवा वापरण्यात येत असल्यास, बँकांनी ग्राहकाला मदत करणा-या बीसीचा तपशील ठेवावा. ग्राहकासाठीच्या ड्यु डिलिजन्सची अंतिम जबाबदारी बँकेचीच असेल.

**(19)**[23]खोडण्यात आले,

**(20)**[24] खोडण्यात आले,

**(21)**[25] खोडण्यात आले,

**(22)** खोडण्यात आले.

**(23)** [26] कलम 16 मध्ये काहीही दिले असले तरी व त्याचा एक पर्याय म्हणून एखादी व्यक्ती बँक खाते उघडण्यास इच्छुक असल्यास बँका त्यासाठी एक 'छोटे खाते' उघडतील व त्याबाबत पुढील मर्यादा आहेत.

(1) एका वित्तीय वर्षामधील सर्व क्रेडिट्सची रक्कम रु. एक लाखापेक्षा अधिक नसावी.

(2) एका महिन्यातील एकूण निकासी व हस्तांतरण रु. दहा हजारांपेक्षा अधिक नसावी आणि

(3) कोणत्याही वेळी शिल्लक रक्कम रु. पन्नास हजारांपेक्षा अधिक नसावी.

[27] मात्र, सरकारी अनुदाने, कल्याण-लाभ व खरेदीसाठी केलेली प्रदाने ह्यामार्फत ठेव ठेवतेवेळी, शिल्लकेवरील ही मर्यादा विचारात घेतली जाणार नाही. ह्याशिवाय, छोट्या खात्यांना पुढील अटी लागु असतील.

(अ) ग्राहकाचा त्याने स्वतःच साक्षांकन केलेला फोटोग्राफ बँकांनी मिळवावा.

(ब) बँकेच्या नेमलेल्या अधिका-याने त्याच्या स्वतःच्या सहीने प्रमाणित करावे की, खाते उघडणा-या व्यक्तीने, त्याच्या उपस्थितीतच ग्राहकाने सही किंवा अंगठ्याचा ठसा उमटविला आहे.

[28] मात्र, जेथे ती व्यक्ती तुरुंगातील एक कैदी असेल तेथे, ती सही किंवा अंगठ्याचा ठसा त्या तुरुंगाच्या प्रभारी अधिका-याच्या उपस्थितीत केली असावी, व त्या अधिका-याने त्याच्या सही खाली तसे प्रमाणित केलेले असावे, आणि तुरुंगाच्या प्रभारी अधिका-याने दरसाल, पत्त्याच्या पुराव्याचे प्रमाणपत्र दिले असल्यासच ते खाते कार्यकारी असेल.

(क) अशी खाती, केवळ कोअर बँकिंग सोल्युशन (सीबीएस) जोडणी असलेल्या शाखांमध्ये किंवा त्या खात्यात विदेशातील प्रेषणे जमा केली जात नाहीत ह्याबाबत प्रत्यक्ष देखरेख करुन त्याबाबत खात्री करुन घेता येईल अशा शाखेमध्येच उघडता येतील.

(ड) एखादा व्यवहार करण्यापूर्वी बँका खात्री करुन घेतील की, अशा खात्यांमध्ये, एकूण व्यवहार व शिल्लक मर्यादा ह्याबाबतच्या वरील अटींचे उल्लंघन/भंग होत नाही.

(ई) हे खाते सुरुवातीला बारा महिन्यांच्या कालावधीसाठी कार्यकारी असेल आणि खाते उघडल्यानंतरच्या बारा महिन्यात, खातेदाराने, अर्ज केला असल्यास व कोणत्याही ओव्हीडीसाठी अर्ज केला असल्याचा पुरावा सादर केल्यास, ते खाते आणखी बारा महिने कार्यकारी ठेवले जाऊ शकते.

(फ) शिथिलतेच्या सर्व तरतुदींचे पुनरावलोकन चोवीस महिन्यानंतर केले जाईल.

(ग) [29] ह्या खात्यावर देखरेख ठेवली जाईल आणि मनी लॉंडरिंग किंवा दहशतवादी कृतींना अर्थसहाय्य किंवा इतर उच्च जोखीम कृतींची शंका आल्यास, त्या ग्राहकाची ओळख कलम/विभाग 16 अन्वये स्थापित केली जाईल.

(ह) कलम 16 अनुसार ग्राहकाची ओळख पटल्याशिवाय त्या खात्यात विदेशी प्रेषणे जमा करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

**(24) [30]बिगर बँकिंग वित्त कंपन्यांद्वारे (एनबीएफसी) खाती उघडण्यासाठी सुलभीकृत कार्यरीतः** खाते उघडण्यास इच्छुक असलेली व्यक्ती, कलम 16 मध्ये विहित केल्यानुसार कागदपत्रे सादर करु शकत नसल्यास, एनबीएफसी, त्यांना तसे वाटल्यास, पुढील अटींवर खाती उघडू शकतात.

(अ) एनबीएफसींनी त्या ग्राहकाकडून त्याने स्वतः साक्षांकन केलेला त्याचा फोटो मिळवावा.

(ब) एनबीएफसीच्या नेमलेल्या अधिका-याने त्याच्या सही खाली प्रमाणित करावे की, खाते उघडणा-या व्यक्तीने, त्याच्या उपस्थितीत ती सही किंवा अंगठ्याचा ठसा उमटविला आहे.

(क) ते खाते सुरुवातीला बारा महिन्यांसाठीच कार्यकारी असेल व त्या कालावधीत, कलम 16 नुसार सीडीडी केली जाईल.

(ड) कोणत्याही वेळी त्याच्या सर्व खात्यांमधील शिल्लक रुपये पन्नास हजारांपेक्षा अधिक असणार नाही.

(ई) सर्व खात्यांमधील एकूण क्रेडिट वर्षात रु. एक लाखापेक्षा अधिक असणार नाही.

(फ) ग्राहकाला जाणीव करुन दिली जाईल की, त्याने वरील (ड) व (ई) चा भंग केल्यास, संपूर्ण केवायसी कार्यरीत पूर्ण केल्याशिवाय, पुढे कोणतेही व्यवहार करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

(ग) खात्यामधील शिल्लक रु चाळीस हजार झाल्यावर किंवा वर्षभरातील एकुण जमा (क्रेडिट) रक्कम रु. ऐंशी हजार झाल्यानंतर, ग्राहकाला कळविण्यात येईल की, केवायसी करण्यासाठी सुयोग्य कागदपत्र सादर केले जावेत अन्यथा,

सर्व खात्यांमधील एकत्रित /एकुण शिल्लक रक्कम, वरील निर्देश(ड) व (ई) मध्ये विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त असल्यास त्या खात्यातील व्यवहार थांबविण्यात येतील.

**(25)**[31]खोडण्यात आले आहे.

**(26)**[32]आरईच्या एका शाखेने/कार्यालयाने एकदा केलेली केवायसी पडताळणी, त्याच आरईच्या इतर कोणत्याही शाखेत/कार्यालयात त्या खात्याचे हस्तांतरण करण्यासाठी वैध असेल. - मात्र, संबंधित खात्यासाठी संपूर्ण केवायसी पडताळणी केली गेलेली असावी व तिचे नियतकालिक अद्यावतीकरण करावयाचे नसावे.

### विभाग 2 - एकमेव मालकी असलेल्या कंपन्यांसाठी सीडीडी उपाय

**(27)** [33]एकमेव मालक असलेल्या कंपनीच्या नावे खाते उघडण्यासाठी, त्या व्यक्तीचे (मालक) सीडीडी केले जाईल.

**(28)** [34]ह्या व्यतिरिक्त, त्या मालकी कंपनीच्या नावे असलेले, व्यवसाय/कार्यकृतीचा पुरावा म्हणून, पुढीलपैकी कोणतेही दोन कागदपत्र किंवा सममूल्य ई-डॉक्युमेंट्स मिळविले जावेत :

(अ) पंजीकरण प्रमाणपत्र

(ब) दुकाने व आस्थापना कायद्याखाली नगरपालिका प्राधिकरणाने दिलेला परवाना/प्रमाणपत्र.

(क) विक्री व आयकर रिर्टन्स

(ड) [35] (तात्पुरते/अंतिम) सीएसटी/व्हॅट/जीएसटी प्रमाणपत्र

(ई) विक्री कर/सेवा कर/व्यवसाय कर प्राधिकरणांनी दिलेले प्रमाणपत्र/पंजीकरण

(फ) डीजीएफटीच्या कार्यालयाने मालकी कंपनीच्या नावे दिलेला आयईसी (आयातकार निर्यातदार संकेत), किंवा एखाद्या वटहुकुमाखाली सुसंस्थापित (इनकॉर्पोरेटेड) झालेल्या व्यावसायिक संस्थेने दिलेला परवाना/प्रमाणपत्र.

(ग) आय कर प्राधिकरणाने साक्षांकन/प्रमाणित केलेले, त्या कंपनीचे उत्पन्न दर्शविणारे, त्या मालकी कंपनीच्या नावे असलेला संपूर्ण आय कर रिटर्न (केवळ पावती नव्हे).

(ह) वीज, पाणी, लॅंड लाईन टेलिफोन इत्यादींची वापर करत असल्याची देयके.

**(29)** अशी दोन कागदपत्रे देणे शक्य नाही ह्याबाबत आरईचे समाधान झाले असल्याच्या प्रकरणात, आरईंना तसे वाटल्यास, ह्यापैकी केवळ एकच डॉक्युमेंट व्यवसाय/कार्यकृतीचा पुरावा म्हणून स्वीकारु शकतात.

मात्र, अशी कंपनी अस्तित्वात असल्याचे सिध्द करण्यासाठी आरईंनी त्या कंपन्यांच्या संपर्क स्थानाची पडताळणी करावी व अन्य माहिती व स्पष्टीकरणे मिळवावीत; आणि त्या मालकी कंपनीच्या पत्त्यावरुन तिची व्यावसायिक कार्यकृती पडताळून पाहिली असल्याबाबत दुजोरा मिळाल्या असल्याबाबत समाधान करुन घ्यावे.

## विभाग 3 - कायदेशीर संस्थांसाठी सीडीडी उपाय

**(30)** [36]एखाद्या कंपनीचे खाते उघडण्यासाठी, पुढीलपैकी प्रत्येक कागदपत्राच्या प्रमाणित केलेल्या प्रती किंवा त्यांचे सममूल्य ई-डॉक्युमेंट्स मिळविले जावेत.

(अ) सुसंस्थापित झाल्याचे प्रमाणपत्र

(ब) मेमोरँडम अँड आर्टिकल्स ऑफ असोसिएशन

(क) [37]कंपनीचा परमनंट अकाऊंट नंबर.

(ड) कंपनीच्या वतीने व्यवहार करण्यास, तिचे व्यवस्थापक, अधिकारी किंवा कर्मचारी ह्यांचा अधिकार व मुखत्यारनामा दिला असल्याबाबत कंपनीच्या संचालक मंडळाचा ठराव.

(ई) [38]कंपनीच्या वतीने व्यवहार करण्याबाबत, मुखत्यारनामा असलेले लाभार्थी मालक, व्यवस्थापक, अधिकारी किंवा कर्मचारी ह्यासंबंधीचे कलम 16 मध्ये विहित केलेले कागदपत्र.

**(31)** [39]भागिदारी संस्थेचे खाते उघडण्यासाठी, पुढीलपैकी प्रत्येक कागदपत्राच्या प्रमाणित केलेल्या प्रती किंवा त्यांच्या सममूल्य ई-डॉक्युमेंट्स मिळावेत.

(अ) पंजीकरण प्रमाणपत्र

(ब) भागीदारी करारनामा

(क) [40] भागीदारी कंपनीचा पर्मनंट अकाऊंट नंबर.

(ड) [41]कंपनीच्या वतीने व्यवहार करण्याबाबत, मुखत्यारनामा असलेले लाभार्थी मालक, व्यवस्थापक, अधिकारी किंवा कर्मचारी ह्यासंबंधीचे कलम 16 मध्ये विहित केलेले कागदपत्र

**(32)** [42]एखाद्या ट्रस्टचे खाते उघडण्यासाठी, पुढीलपैकी प्रत्येक कागदपत्राच्या प्रमाणित केलेल्या प्रती किंवा त्यांचे सममूल्य ई-डॉक्युमेंट्स मिळवावेत :

(अ) पंजीकरण प्रमाणपत्र

(ब) ट्रस्ट डीड

(क) [43] ट्रस्टचा परमनंट अकाऊंट नंबर किंवा फॉर्म 60.

(ड) [44]कंपनीच्या वतीने व्यवहार करण्याबाबत, मुखत्यारनामा असलेले लाभार्थी मालक, व्यवस्थापक, अधिकारी किंवा कर्मचारी ह्यासंबंधीचे कलम 16 मध्ये विहित केलेले कागदपत्र

**(33)**अ [45]सुसंस्थापित न झालेला (अनइन कॉर्पोरेटेड) संघ किंवा व्यक्तींची एखादी संस्था/संघ ह्यांचे खाते उघडण्यासाठी, पुढीलपैकी प्रत्येक कागदपत्राच्या प्रमाणित केलेल्या प्रती किंवा त्यांचे सममूल्य ई-डॉक्युमेंट्स मिळवावेत.

(अ) अशा संघाच्या किंवा व्यक्तींच्या संघाच्या व्यवस्थापकीय बॉडीने केलेला ठराव.

(ब) [46] तो अनइन कॉर्पोरेटेड संघ किंवा व्यक्तीचा संघाचा परमनंट अकाऊंट नंबर किंवा फॉर्म 60.

(क) तिच्या वतीने व्यवहार करण्यासंबंधीचा मुखत्यारनामा.

(ड) [47]कंपनीच्या वतीने व्यवहार करण्याबाबत, मुखत्यारनामा असलेले लाभार्थी मालक, व्यवस्थापक, अधिकारी किंवा कर्मचारी ह्यासंबंधीचे कलम 16 मध्ये विहित केलेले कागदपत्र

(ई) अशा संघाचे किंवा व्यक्तींच्या बॉडीचे कायदेशीर अस्तित्व एकत्रितपणे सिध्द करण्यासाठी आरईला आवश्यक वाटत असलेली कागदपत्रे

स्पष्टीकरण :- 'अनइन कॉर्पोरेटेड संघ' ह्या संज्ञेखाली, पंजीकृत न झालेले ट्रस्ट/भागीदारी संस्था समाविष्ट आहेत.
स्पष्टीकरण :- 'व्यक्तींची संस्था (बॉडी)' ह्यात सोसायट्याही समाविष्ट आहेत.

(33)ब [48]सोसायट्या, युनिव्हर्सिटीज् आणि ग्रामपंचायतीसारख्या स्थानिक संस्था ह्यासारख्या, आधीच्या भागात समाविष्ट न केलेल्या कायदेशीर व्यक्तींची खाती उघडण्यासाठी, पुढीलपैकी प्रत्येक कागदपत्राच्या प्रमाणित केलेल्या प्रती किंवा त्यांचे सममूल्य ई-डॉक्युमेंट्स मिळविले जावेत :

(अ) त्या संस्थेच्या वतीने काम/व्यवहार करण्यास प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचे नाव निर्देशित करणारे कागदपत्र.
(ब) कलम 16 मध्ये विहित केल्याप्रमाणे, तिच्या वतीने व्यवहार करण्याबाबत मुखत्यारनामा मिळालेल्या व्यक्तीचे कागदपत्र आणि
(क) अशी संस्था/कायदेशीर व्यक्ती ह्यांचे कायदेशीर अस्तित्व सिध्द करण्यासाठी आरईला आवश्यक वाटत असलेले कागदपत्र.

**विभाग 4 - लाभार्थी मालकाची ओळख पटविणे**

**(34)** एक नैसर्गिक व्यक्ती नसलेल्या कायदेशीर व्यक्तीचे खाते उघडण्यासाठी लाभार्थी मालकांची ओळख पटविली जाईल आणि पुढील गोष्टी विचारात घेऊन, ह्या नियमावलीच्या नियम 9 च्या पोटनियम (3) अनुसार, त्याची/तिची ओळख पटविण्यासाठी योग्य ती पाऊले उचलली जातील.

(अ) जेथे, ग्राहक किंवा नियंत्रक हितसंबंधांचा मालक हा स्टॉक एक्सचेंजवर सूचिबध्द कंपनी किंवा अशा कंपनीची दुय्यम/सहाय्यक कंपनी असेल, तेथे तिच्या कोणत्याही शेअर धारकाची किंवा लाभार्थी मालकाची ओळख पटविण्याची किंवा पडताळून पाहण्याची गरज नाही.

(ब) जेथे ग्राहक दुस-याच एका व्यक्तीच्या वतीने, ट्रस्टी/नॉमिनी किंवा अन्य कोणताही मध्यस्थ म्हणून ठरविला गेला आहे अशा ट्रस्ट/नॉमिनी किंवा विश्वासाधिष्ट खात्यांच्या बाबतीत, ते मध्यस्थ, आणि ज्याच्या वतीने काम करत आहेत त्या व्यक्ती, ह्यांच्या ओळखीचा समाधानकारक पुरावा, तसेच त्या ट्रस्टचे स्वरुप किंवा केलेल्या इतर व्यवस्था ह्यांचा तपशीलही मिळविला जावा.

## विभाग 5 - सततचा ड्यु डिलिजन्स

**(35)** करण्यात येणारे व्यवहार हे आरईंची ग्राहकांसंबंधीची माहिती, व्यवसाय व जोखीम रुपरेषा व उत्पन्न स्त्रोत ह्यांना धरुनच असल्याची खात्री करुन घेण्यासाठी, आरई, ग्राहकांचा सातत्याने ड्यु डिलिजन्स करतील.

**(36)** जवळून देखरेख करण्यासाठी, असलेले सर्वसामान्य घटक कोणतेही असले तरी पुढील प्रकारच्या व्यवहारांवर अवश्य देखरेख ठेवली जावी.

(अ) आरटीजीएस व्यवहारांसह, मोठे व गुंतागुंतीचे व्यवहार, अवाजवी साचा असलेले, ग्राहकाच्या नेहमीच्या व अपेक्षित कार्यकृतींशी न जुळणारे, कोणतीही कारणमींमासा किंवा कायदेशीर हेतु दिसून येत नसलेले व्यवहार.

(ब) खात्यांच्या विशिष्ट वर्गासाठी विहित केलेल्या मर्यादांचे उल्लंघन करणारे व्यवहार.

(क) ठेवलेल्या शिल्लकेशी न जुळणारी उच्चतर उलाढाल असलेली खाती.

(ड) नवीनच विद्यमान खात्यात तृतीय पक्षाचे चेक्स, ड्राफ्ट्स जमा केल्यानंतर, मोठ्या रकमेची निकासी केली जाणे.

**(37)** अशी देखरेख ग्राहकाच्या जोखीम वर्गाशी जुळणारी असावी.

स्पष्टीकरण : उच्च जोखीम खात्यावर अधिक कडक देखरेख ठेवली जावी.

(अ) सहा महिन्यातून किमान एकदा अशा वारंवारतेने, खात्यांच्या नियतकालिक जोखीम वर्गीकरणाची प्रणाली ठेवली जावी आणि वाढीव ड्यु डिलिजन्सचे उपाय केले जावेत.

(ब) मार्केटिंग करणा-या कंपन्यांचे व विशेषतः बहुस्तरीय मार्केटिंग (एमएलएम) कंपन्यांच्या खात्यांवर जवळून देखरेख केली जावी.

स्पष्टीकरण : जेथे कंपनीकडून मोठ्या संख्येने चेक बुक्स घेतली जातात आणि/किंवा एकाच बँक खात्यात देशभरातून अनेक छोट्या रकमा (बहुशः रोख) जमा केल्या जातात, आणि/किंवा तशाच रकमा/तारखा असलेले चेक्स मोठ्या संख्येने दिले जातात तेथे अशी प्रकरणे ताबडतोब भारतीय रिझर्व्ह बँकेला व एफआययु-आयएनडी ह्यासारख्या सुयोग्य प्राधिकरणांना कळविली जावीत.

**(38)** नियतकालिक अद्यावतीकरण

उच्च जोखमीच्या ग्राहकांसाठी दोन वर्षातून एकदा, मध्यम जोखमीच्या ग्राहकांसाठी 8 वर्षातून एकदा व निम्न जोखमीच्या ग्राहकांसाठी 10 वर्षातून एकदा चे नियतकालिक अद्यावतीकरण पुढील रीतीनुसार केले जाईल :

(अ) आरई पुढील कार्यरीतींचे अनुसरण करतील.

(1) नियतकालिक अद्यावतीकरणाचे वेळी कलम 16 मध्ये विहित केल्यानुसार सीडीडी. तथापि, निम्न जोखमींच्या ग्राहकांबाबत, त्यांची ओळख व पत्ते ह्यांच्या स्थितीत बदल झाला नसल्यास, त्या अर्थाचे स्वयं-घोषणापत्र घेतले जावे.

(2) कायदेशीर संस्थांच्या बाबतीत, त्यांनी खाते उघडतेवेळी सादर केलेल्या कागदपत्रांचे, आरई, पुनरावलोकन करुन त्यांच्या नव्या प्रती मिळवितील.

[49]मात्र, आरई खात्री करुन घेतील की, ह्या महानिर्देशाच्या विद्यमान आवश्यकतांनुसारचे केवायसी कागदपत्र त्यांच्याकडे उपलब्ध आहेत.

(ब) खातेदारांची खरी ओळख पटविण्यासाठी त्यांची प्रत्यक्ष हजेरी आवश्यक असल्याबाबत पुरेशी कारणे नसल्यास, ओव्हीडी देण्यास किंवा आधारचे सत्यांकन/ऑफलाईन पडताळणी करण्यास सहमती देण्यासाठी, ग्राहकाने प्रत्यक्ष हजर होण्याचा आग्रह आरई करणार नाहीत. सामान्यतः, ग्राहकाने मेल/पोस्ट इत्यादींद्वारे पाठविलेली ओव्हीडी/सहमती स्वीकार्य असेल.

(क) केवायसीचे अद्यावतीकरण केले असल्याच्या तारखेसह पोच पावती दिली असल्याची खात्री आरईंनी करुन घ्यावी.

(ड) वर विहित केलेल्या कालमर्यादा, खाते उघडण्याच्या/केवायसीची शेवटून पडताळणी केल्याच्या तारखेपासून लागु असेल.

(39)[50] विद्यमान ग्राहकांच्या बाबतीत, केंद्र सरकारने विहित केलेल्या अधिसूचित केलेल्या तारखेपर्यंत, आरई, पर्मनंट अकाऊंट नंबर किंवा त्याचे सममूल्य ई-डॉक्युमेंट किंवा फॉर्म क्र.60 मिळवितील. तसे न केल्यास ग्राहकाने त्याचा पर्मनंट अकाऊंट क्र. किंवा त्याचे सममूल्य ई-डॉक्युमेंट किंवा फॉर्म क्र.60 सादर करेपर्यंत आरई, त्याच्या खात्यात केले जाणारे व्यवहार तात्पुरते थांबवितील.

मात्र, एखाद्या खात्यातील व्यवहार तात्पुरते थांबविण्यापूर्वी, आरई, त्या ग्राहकाला मिळेल अशी नोटिस आणि सुनावणीची एक संधी देतील. ह्याशिवाय, इजा, आजारपण किंवा वृध्दपणामुळे किंवा अन्यथा आलेली अशक्तता/व्यंग ह्यामुळे, पर्मनंट अकाऊंट नंबर किंवा त्याच्या सममूल्य ई-डॉक्युमेंट देण्यास सक्षम नसलेल्या ग्राहकांसाठी, त्यांच्या खात्यांची कार्यवाही अखंडित ठेवण्यासाठी, आरई, त्यांच्या अंतर्गत धोरणात सुयोग्य शिथिलतांचा समावेश करतील. तथापि, अशा खात्यांवर अधिकतर देखरेख ठेवली जाईल.

मात्र ह्याशिवाय, त्या आरईबरोबर विद्यमान खाते संबंध असलेल्या ग्राहकाने, तो त्याचा परमनंट अकाऊंट नंबर किंवा त्याचे सममूल्य ई-डॉक्युमेंट किंवा फॉर्म क्र.60 देण्यास तक्रार नाही असे लेखी स्वरुपात आरईला कळविल्यास, आरई ते खाते बंद करील आणि त्या ग्राहकाला लागु असलेले ओळखीसंबंधीचे कागदपत्र मिळवून त्याची ओळख पटविल्यानंतर त्या खात्यासंबंधीची सर्व दायित्वे सुयोग्यतेने तडजोडित करील.

स्पष्टीकरण : ह्या विभागासाठी एखाद्या खात्याचे ‘कामकाज तात्पुरते बंद करणे’ म्हणजे, ह्या विभागाच्या तरतुदींचे ग्राहकाने अनुपालन करेपर्यंत आरईने, त्या खात्यासंबंधीचे सर्व व्यवहार किंवा कार्यकृती तात्पुरत्या प्रलंबित ठेवणे. कर्ज खात्यासारख्या ॲसेट खात्यांबाबत, खात्याची कार्यकृती थांबविणे म्हणजे केवळ क्रेडिट करण्यास परवानगी देणे.

## विभाग 6 - वाढीव व सुलभीकृत ड्यु डिलिजन्स कार्यरीत

### (अ) वाढीव ड्यु डिलिजन्स

**(40)** [51]समोरासमोर/प्रत्यक्ष न येणा-या ग्राहकांची (आधार ओटीपी आधारित ऑनलाईन खाती : प्रत्यक्ष हजर न होणा-या ग्राहकांच्या वाढीव ड्यु डिलिजन्ससाठी, आरईंनी खात्री करुन घ्यावी की, प्रथम प्रदान हे त्या ग्राहकांच्या दुस-या आरईमधील केवायसी अनुपालित खात्यामधूनच करण्यात आले आहे.

**(41) राजकीय एक्सपोझर असलेल्या व्यक्तींची (पीईपी) खाती :**

(अ) पीईपी बरोबर संबंध ठेवण्याचा पर्याय आरईंना पुढील अटींवर असेल.

(अ) त्या पीईपीच्या बाबतीत, कुटुंबातील सभासदांच्या व जवळच्या नातेवाईकांच्या खात्यांची व उत्पन्न स्त्रोतांची माहिती गोळा केली जावी.

(ब) पीईपीचा ग्राहक म्हणून स्वीकार करण्यापूर्वी त्या व्यक्तीची ओळख पडताळून पाहिली जावी.

(क) आरईच्या ग्राहक स्वीकार धोरणानुसार, त्या पीईपीचे खाते उघडण्याबाबतचा निर्णय वरिष्ठ स्तरावर घेतला जावा.

अशा सर्व खात्यांसाठी सातत्याने देखरेख ठेवली जावी.

(ई) एखाद्या विद्यमान खात्याचा विद्यमान ग्राहक किंवा लाभार्थी मालक नंतर पीईपी झाल्यास, तो व्यवहार संबंध पुढे चालु ठेवण्यास वरिष्ठ व्यवस्थापनाची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

(फ) सातत्याने करावयाच्या वाढीव देखरेखीसह पीईपींना लागु असलेले सीडीडी उपायही लागु असतील.

(ब) जेथे पीईपी हा लाभार्थी मालक आहे अशा खात्यांनाही ह्या सूचना लागु असतील.

**(42) व्यावसायिक मध्यस्थांनी उघडलेली खाती :**

व्यावसायिक मध्यस्थांमार्फत ग्राहकांची खाती उघडताना आरईंनी खात्री करुन घ्यावी की :

(अ) व्यावसायिक मध्यस्थाने केवळ एकल/एकाच ग्राहकाच्या वतीने ग्राहकाचे खाते उघडले असल्यास ग्राहकाची ओळख पाठविण्यात येत आहे.

(ब) म्युच्युअल फंड, पेन्शन फंड किंवा इतर प्रकारचे फंड ह्यांच्यावतीने व्यावसायिक मध्यस्थांकडून चालविल्या जाणा-या खात्यांसाठी ‘एकत्रित (पूल्ड)’ खाती ठेवण्याचा पर्याय आरईंना असेल.

(क) आरईंकडे ग्राहकाच्या माहितीचा तपशील प्रकट करण्यास मनाई करणा-या कोणत्याही गोपनीयतेने बध्द असलेल्या अशा व्यावसायिक मध्यस्थांची खाती आरई उघडणार नाहीत.

(ड) मध्यस्थांनी ठेवलेले/धारण केलेले निधी, आरईच्या स्तरावर एकत्र मिसळलेले नाहीत आणि पोट-खातीही असून त्यापैकी प्रत्येक एका लाभार्थी मालकाचेच आहे तेथे सर्व लाभार्थी मालकांची ओळख पाठविली जाईल

किंवा जेथे असे निधी आरईच्या स्तरावर एकत्र मिसळले गेले आहेत तेथे, आरई लाभार्थी मालकांचा शोध घेईल.

(ई) आरई, त्यांना तसे वाटल्यास, मध्यस्थाने केलेल्या 'कस्टमर ड्यु डिलिजन्स' (सीडीडी) अवलंबून राहू शकतात - मात्र, तो मध्यस्थ एक विनियमित व पर्यवेक्षित संस्था असली पाहिजे आणि तिच्याकडे ग्राहकांच्या केवायसी आवश्यकतांचे अनुपालन करण्याच्या सुयोग्य प्रणाली असल्या पाहिजेत.

(फ) ग्राहकाच्या ओळखीबाबतची अंतिम जबाबदारी आरईचीच असेल.

**(ब) सुलभीकृत ड्यु डिलिजन्स**

**(43) [52] स्वयंसेवा गटांसाठीचे (एसएचजी) सुलभीकृत नॉर्म्स**

(अ) एसएचजीचे खाते उघडताना त्या एसएचजीच्या सर्व सभासदांचे सीडीडी करण्याची आवश्यकता नाही.

(ब) सर्व सभासदांचे सीडीडी पुरेसे असेल.

(क) एसएचजीची कर्ज जोडणी करतेवेळी, ह्या एमडीच्या कलम 16 मध्ये दिलेल्या सीडीडी कार्यकृतीनुसार केल्याचे सीडीडी करण्याची आवश्यकता नाही.

**(44) विदेशातील विद्यार्थ्यांची खाती उघडताना बँकांनी अनुसरण्याची कार्यरीत**

(अ) बँका, त्यांना तसे वाटल्यास, एखाद्या विदेशी विद्यार्थ्यांचे अनिवासी सामान्य (एचआरओ) बँक खाते, त्याच्या/तिच्या ओळखीचा पुरावा व स्वदेशातील पत्ता असलेला त्याचा/तिचा पासपोर्ट (व्हिसा व इमिग्रेशनच्या एंडॉर्समेंटसह) व त्यासोबत त्याचा/तिचा फोटो आणि भारतातील शैक्षणिक संस्थेचे प्रवेश दिला जाण्याबाबतचे पत्र ह्याच्या आधारावर उघडू शकतात.

(1) मात्र, स्थानिक पत्त्याबाबतचे घोषणापत्र ते खाते उघडल्यानंतर 30 दिवसांच्या आत मिळविले जावे व त्या स्थानिक पत्त्याची पडताळणी केलेली असावी.

(2) मात्र ह्याशिवाय, पत्त्याची पडताळणी होईपर्यंत, ते खाते, युएसडी 1000 किंवा त्याच्या सममूल्य पर्यंत विदेशी प्रेषणे खात्यात जमा करण्यास परवानगी असल्याच्या आणि 30 दिवसांच्या कालावधीत एकूण रुपये पन्नास हजाराच्या मर्यादेच्या अटीवर ते खाते सुरु ठेवता येईल.

(ब) हे खाते एक सामान्य एनआरओ खाते म्हणून समजले जाईल आणि, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अनिवासी सामान्य रुपये (एनआरओ) खाते वरील सूचना व फेमा 1999 च्या तरतुदींच्या अटींवर चालविले जाईल.

(क) पाकिस्तानी राष्ट्रीयत्व असलेल्या विद्यार्थ्यांना खाते उघडण्यासाठी रिझर्व्ह बँकेची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक असेल.

**(45) विदेशी पोर्टफोलियो निवेशकांसाठी (एफ पी आय) सुलभीकृत केवायसी नॉर्म्स**

पोर्टफोलियो गुंतवणुक योजनेखाली (पीआयएस) गुंतवणुक करण्यासाठी, सेबीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार पात्र/पंजीकृत एफपीआयची खाती, आय कर (एफएटीसीए/सीआरएस) नियमांच्या अटींवर, जोडपत्र 3 मध्ये दिलेली केवायसी कागदपत्रे स्वीकारुन उघडता येतील.

मात्र, ह्यासाठी बँका, एफपीआय किंवा एफपीआयच्या वतीने असलेल्या ग्लोबल कस्टडियनकडून घोषणापत्र घेतील की, जोडपत्र 3 मध्ये दिलेली सूट देण्यात आलेली कागदपत्रे बँकेला पाहिजे तेव्हा सादर केली जातील.

## प्रकरण 7

## अभिलेख व्यवस्थापन

**(46)** पीएमएल अधिनियम व नियमावलीच्या तरतुदींच्या संदर्भात, ग्राहकाच्या खात्याची ठेवणे, जतन करणे व कळविणे ह्याबाबत पुढील उपाय/कृती केल्या जातील.

(अ) आरई व ग्राहक ह्यामधील व्यवहाराचे - देशांतर्गत तसेच विदेशातील - आवश्यक रेकॉर्ड्स, व्यवहाराच्या तारखेपासून किमान पाच वर्षेपर्यंत ठेवतील.

(ब) ग्राहकांशी असलेला व्यवहार संबंध संपल्यानंतरही, त्यांचे खाते उघडतेवेळी आणि व्यवहार संबंधांदरम्यान मिळालेली ग्राहकाची ओळख व त्यांचे पत्ते ह्याचे रेकॉर्ड किमान पाच वर्षांपर्यंत जतन करुन ठेवतील.

(क) सक्षम प्राधिकरणाने विनंती केल्यास ओळखीसंबंधीचे रेकॉर्ड्स व व्यवहाराची माहिती उपलब्ध करुन देतील.

(ड) प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉंडरिंग (रेकॉर्ड ठेवणे) नियमावली, 2005 (पीएमएल नियमावली 2005) च्या नियम 3 खाली विहित केल्यानुसार सुयोग्य रेकॉर्ड ठेवण्याची प्रणाली तयार करतील.

(ई) पुढील बाबींसह, प्रत्येक व्यवहाराची पुनर्रचना करता येण्यासाठी पीएमएल नियम 3 खाली विहित केलेल्या व्यवहारांबाबत आवश्यक ती सर्व माहिती ठेवतील.

(1) व्यवहारांचा प्रकार

(2) व्यवहाराची रक्कम व तो करण्यात आलेले चलन

(3) तो व्यवहार, केवायसी तारीख आणि

(4) व्यवहारातील पक्ष

(फ) पाहिजे असेल तेव्हा किंवा सक्षम प्राधिकरणाने मागणी केल्यावर माहिती सहजपणे व त्वरित मिळू शकेल अशा प्रकारची, सुयोग्यतेने ठेवण्याची व जतन करण्याची प्रणाली निर्माण करतील.

(ग) नियम 3 मध्ये संदर्भित व्यवहारांबाबतचे व ग्राहकाची ओळख व पत्ता ह्यांचे रेकॉर्ड्स हार्ड किंवा सॉफ्ट स्वरुपात ठेवतील.

## प्रकरण 8

## फायनान्शियल इंटेलिजन्स युनिटइंडिया अहवाल पाठविण्याच्या आवश्यकता

**(47)** पीएमएल (रेकॉर्ड ठेवणे) नियमावली 2005 च्या नियम 7 अन्वये, नियम 3 मधील संदर्भित माहिती, आरई, संचालक, फायनान्शियल इंटलिजन्स युनिट - इंडियन्स (एफआययु-आयएनडी) पाठवितील.

स्पष्टीकरण :- नियम 7 च्या पोटनियम 3 व 4 मध्ये केलेल्या बदल/सुधारणांबाबत, सप्टेंबर 22, 2015 रोजी अधिसूचित केलेल्या तिस-या नियम सुधारणा नुसार, नियम 3 च्या पोटनियम (1) च्या निरनिराळ्या खंडांमध्ये संदर्भित केलेले व्यवहार शोधण्यास/ओळखण्यास, संचालक, एफआययु-आयएनडी ह्यांचेकडे, आरईंना मार्गदर्शक तत्वे देण्याचे, माहिती देण्याच्या स्वरुपाबाबत निर्देशन देण्याचे आणि माहिती देण्याची कार्यरीत व रीत विहित करण्याचे अधिकार असतील.

**(48)** एफआययु-आयएनडीने विहित/प्रवृत्त केलेले अहवाल पाठविण्याचे नमुने व सर्वसमावेशक अहवाल कळविण्यासाठीच्या नमुन्यांची मार्गदर्शक पुस्तिका, आणि विहित केलेले रिपोर्ट्स तयार करण्यासाठी, अहवाल पाठविणा-या संस्थांना मदत करण्यासाठी विकसित केलेल्या रिपोर्ट जनरेशन युटिलीटी व रिपोर्ट व्हेलिडेशन युटिलीटी ह्यांचीही नोंद घेण्यात यावी. एफआययु-आयएनडीने तिच्या वेबसाईटवर टाकलेल्या, रोख व्यवहार अहवाल (सीटीआर)/संशयास्पद व्यवहार अहवाल (एसटीआर) सादर करण्यासाठी असलेल्या एडिटेबल इलेक्ट्रॉनिक युटिलीटीज्चा उपयोग, प्रत्यक्ष (लाईव्ह) ट्राँझॅक्शन डेटामधून सीटीआर/एसटीआर काढण्यासाठी सुयोग्य अशी तांत्रिक साधने अद्याप स्थापित केली नसलेल्या/स्वीकार केला नसलेल्या आरईंनी करावा. ज्यांच्या सर्व शाखा संगणीकृत झालेल्या नाहीत अशा आरईंच्या मुख्य अधिका-यांनी, अद्याप संगणीकृत न झालेल्या शाखांमधून व्यवहारांचा तपशील मागविण्याची व्यवस्था करावी, आणि एफआययु-आयएनडीने तिच्या वेबसाईटवर http://fiuindia.gov.in उपलब्ध केलेल्या सीटीआर/एसटीआरच्या एडिटेबल इलेक्ट्रॉनिक युटिलीटीजच्या मदतीने, ती माहिती एका इलेक्ट्रॉनिक फाईलमध्ये ठेवावी.

(49) एफआययु-आयएनडीच्या संचालकांना माहिती सादर करताना, ह्या नियमांमध्ये विहित केलेल्या कालावधीच्या पलिकडे, एखादा व्यवहार न कळविण्यातील प्रत्येक दिवसाचा विलंब किंवा चुकीने कळविलेल्या व्यवहाराबाबत चूक सुधारण्यातील प्रत्येक दिवसाचा विलंब हे एक वेगवेगळे उल्लंघन समजले जाईल. एसटीआर दाखल केला आहे अशा खात्यांमधील व्यवहारांवर आरई कोणतेही निर्बंध घालणार नाही. एसटीआर सादर केल्याबाबत आरई कडक गोपनीयता ठेवतील. कोणत्याही स्तरावर त्या ग्राहकाला इशारा देण्यात येत नसल्याची खात्री केली जावी.

(50) परिणामकारकतेने ओळख पटविणे व संशयास्पद व्यवहार कळविणे ह्यांचा एक भाग म्हणून, दणकट सॉफ्टवेअर, जोखीम वर्गीकरणाशी न जुळणारे व्यवहार होत असल्यास सावधानतेचा इशारा दिला जाणे आणि ग्राहकाची अद्यावत रुपरेषा ठेवली जावी.

## प्रकरण 9

## आंतरराष्ट्रीय करारनाम्यांखालील आवश्यकता/दायित्वे

## आंतरराष्ट्रीय एजन्सीजकडून संदेशन/दळणवळण

**(51)** आरईंनी खात्री करुन घ्यावी की, बेकायदेशीर कार्यकृती (प्रतिबंध) (युएपीए) अधिनियम 1967 च्या कलम 51ए व त्यातील बदल/सुधारणांनुसार, त्यांचे कडे संयुक्त राष्ट्रे सुरक्षा मंडळाने (युएनएससी) मंजुर केलेल्या व नियतकालिकतेने प्रसारित करण्यात येत असलेल्या, दहशतवादाशी संबंध असल्याबाबत संशय असलेल्या व्यक्ती व संस्थांच्या यादीमधील व्यक्ती/ संस्थांच्या नावे कोणतेही खाते ठेवण्यात / उघडण्यात आलेले नाही. ह्या दोन याद्यांचा तपशील पुढीलप्रमाणे :-

(अ) 'आयएस आयएल (दा'एरा) आणि अल-कायदा सँक्शन लिस्ट' ह्यात अल-कायदाशी संबंधित असलेल्या व्यक्ती व संस्थांची नावे समाविष्ट केलेली आहेत. अद्यावत केलेली आयएस आयएल व अल-कायदा सँक्शन यादी https://scsanctions.un.org/fop/fop?xml=htdocs/resources/xml/en/consolidated.xml&xslt=htdocs/resources/xsl/en/al-qaida-r.xsl वर उपलब्ध आहे.

(ब) '1988 सँक्शन यादी' की ज्यात, तालिबानशी जोडणी असलेल्या व्यक्ती (एकत्रित यादीचा विभाग अ) आणि संस्था (विभाग ब) दिल्या आहेत, https://scsanctions.un.org/fop/fop?xml=htdocs/resources/xml/en/consolidated.xml&xslt=htdocs/resources/xsl/en/taliban-r.xsl वर उपलब्ध आहे.

**(52)** ह्या याद्यांमधील व्यक्तींशी/संस्थांशी साम्य असलेल्या खात्यांची तपशीलवार माहिती, युएपीए अधिसूचना दि. मार्च 14, 2019 खाली आवश्यक असल्यानुसार, गृह व्यवहार मंत्रालयाला कळविण्याव्यतिरिक्त, एफआययु-आयएमडीलाही कळविली जावी.

**(53)** ह्याव्यतिरिक्त, इतर कोणत्याही अधिकार क्षेत्रे/संस्थांच्या बाबत, रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी प्रसारित केलेल्या युएनएससीआरचीही नोंद/दखल घेण्यात यावी.

**(54) बेकायदेशीर कार्यकृती (प्रतिबंध) अधिनियम, 1967 च्या कलम 51अ खाली मालमत्ता गोठविणे.**

युएपीए आदेश दि. [53]मार्च 14, 2019 मध्ये (ह्या महानिर्देशाचे जोडपत्र 2) दिलेल्या कार्यकृतीचे कडक अनुसरण केले जावे आणि सरकारने दिलेल्या आदेशाचे काटेकोरपणे पालन केले जावे.

**(55) एफएटीएफच्या शिफारशी लागु न करणारी किंवा पुरेशी लागु न करणारी अधिकार क्षेत्रे**

(अ) एफएटीएफच्या शिफारशी लागु न करणारे किंवा पुरेशी लागु न करणारे देश ओळखण्यासाठी, भारतीय रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी प्रसारित केलेली निवेदने आणि सार्वजनिकरित्या उपलब्ध असलेली माहिती विचारात घेतली जावी. एफएटीएफ निवेदनात समाविष्ट केलेल्या अधिकारक्षेत्राच्या एएमएल/सीएफटी कारकिर्दीतील त्रुटींमधील जोखमीही विचारात घेतल्या जाव्यात.

(ब) एफएटीएफच्या शिफारशी लागु न करणारे, एफएटीएफ निवेदनात दिलेले देश व अधिकारक्षेत्रे ह्यामधील व्यक्तींशी (कायदेशी व्यक्ती व इतर वित्तीय संस्थांसह) करण्यात येणा-या व्यावसायिक संबंधांकडे व व्यवहारांकडे विशेष लक्ष देण्यात यावे.

*स्पष्टीकरण :- कलम 55अ व ब मध्ये संदर्भित केलेली प्रक्रिया, एफएटीएन निवेदनात निर्देशित केलेल्या देशांबरोबर व अधिकार क्षेत्रांबरोबर कायदेशीर व व्यावसायिक व्यवहार करण्यास आरईंना प्रतिबंध करत नाही.*

(क) एफएटीएफच्या शिफारशी लागु न करणा-या किंवा अपु-या लागु करणा-या, एफएटीएफ निवेदनात समाविष्ट केलेल्या अधिकार क्षेत्रातील व्यक्तींबरोबर (कायदेशीर व्यक्ती व इतर वित्तीय संस्थांसह) केलेल्या व्यवहारांची पार्श्वभूमी व हेतूची तपासणी केली जावी, आणि आढळलेली माहिती लेखी स्वरुपात, सर्व कागदपत्रांसह जपून ठेवली जावी आणि रिझर्व्ह बँक/इतर संबंधित प्राधिकरणांनी विनंती केल्यास उपलब्ध केली जावी.

## प्रकरण 10

## इतर सूचना

### 56. [54]गोपनीयतेचे दायित्व आणि माहिती शेअर करणे :

(अ) बँकर व ग्राहक ह्यांच्या दरम्यानच्या करारानुसार ग्राहकांच्या माहितीबाबत बँका गोपनीयता ठेवतील.

(ब) खाते उघडण्यासाठी ग्राहकाकडून गोळा केलेली माहिती गोपनीय समजली जाईल व ती माहिती, क्रॉस सेलिंग करण्यासाठी, किंवा ग्राहकाची स्पष्ट सहमती घेतल्याशिवाय अन्य कोणत्याही हेतूने प्रकट केली जाऊ नये.

(क) सरकार किंवा अन्य एजन्सीज् कडून माहिती/डेटा साठीच्या विनंतीचा विचार करताना, बँका समाधान करुन घेतील की, मागण्यात आलेली माहिती, बँकिंग व्यवहारांमधील गोपनीयतेच्या तरतुदींचा भंग होईल अशा स्वरुपाची नाही.

(ड) ह्याबाबतचे अपवाद पुढीलप्रमाणे असतील.

(1) असे प्रकटीकरण करणे कायद्याने सक्तीचे आहे.
(2) जनतेसाठी ती प्रकट करणे हे कर्तव्य आहे.
(3) बँकेच्या हितसंबंधांच्या दृष्टीने प्रकट करणे आवश्यक आहे.
(4) जेथे ग्राहकाच्या अभ्यासात किंवा स्पष्ट सहमतीने माहिती उघड केली आहे.

(ई) आरबीआय अधिनियम 1934 च्या कलम 45 एनबीनुसार एनबीएफसी माहिती गोपनीय ठेवतील.

### (57) केंद्रीय केवायसी अभिलेख रजिस्ट्री (सीकेवायसीआर) बरोबर सीडीडी कार्यरीत व माहिती शेअर करणे

'व्यक्ती' आणि 'कायदेशीर संस्था' असेल त्यानुसार तयार केलेल्या सुधारित केवायसी टेंप्लेट्स साठी आवश्यक असल्यानुसार, ह्या नियमांमध्ये निर्देशित केलेल्या रीतीने, सीकेवायसीआर बरोबर शेअर करावयाची केवायसी माहिती

आरई मिळवतील. राजपत्र अधिसूचना क्र. एस.ओ. 3183(ई) दि. नोव्हेंबर 26, 2015 अन्वये, भारत सरकारने, सेंट्रल रजिस्ट्री ऑफ सिक्युरिटायझेशन ॲसेट रिकन्स्ट्रक्शन अँड सिक्युरिटी इंटरेस्ट ऑफ इंडिया (सीईआरएसएआय) ह्यांना, सीकेवायसीआर म्हणून, व तिची कार्ये करण्यास प्राधिकृत केले आहे.

सीकेवायसीआरचे प्रत्यक्षातील कार्य ('लाईव्ह रन'), 'नवीन व्यक्तीगत खात्यांनी', जुलै 14, 2016 पासून, टप्प्याटप्प्याने सुरु होईल. त्यानुसार, आरईंनी पुढील पाऊले उचलावीत :

(1) प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉंडरिंग (रेकॉर्ड ठेवणे) नियमावली, 2005 च्या तरतुदींनुसार, अनुसूचित वाणिज्य बँकांनी, बिनचुकपणे, जानेवारी 1, 2017 रोजी किंवा त्यानंतर उघडलेल्या सर्व नवीन व्यक्तिगत खात्यासंबंधीची केवायसी माहिती, सीईआरएसएआयकडे अपलोड करणे आवश्यक आहे. तथापि, जानेवारी 2017 मध्ये उघडण्यात आलेल्या खात्यांबाबतची माहिती अपलोड करण्यास, एससीबींना फेब्रुवारी 1, 2017 पर्यंत वेळ देण्यात आला आहे.

(2) प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉंडरिंग (रेकॉर्ड ठेवणे) अधिनियम, 2005 च्या तरतुदीनुसार, एप्रिल 1, 2017 रोजी किंवा त्यानंतर उघडण्यात आलेल्या सर्व नवीन व्यक्तिगत खात्यांची केवायसी माहिती, एससीबी सोडून अन्य आरई, सीईआरएसएआयकडे अपलोड करतील.

(3)केवायसी माहिती अपलोड करण्यासाठीची कार्यकारी मार्गदर्शक तत्वे (आवृत्ती 1.1) सीएआरएसएआयकडून प्रसृत करण्यात आली आहेत. ह्याशिवाय, आरईंच्या उपयोगासाठी 'टेस्ट एनव्हायरन्मेंट' ही सीईआरएसएआयकडून उपलब्ध करण्यात आले आहे.

**(58) विदेशी खाते कर अनुपालन अधिनियम (एफएटीसीए) खालील अहवाल आवश्यकता व सामान्य अहवाल मानके (सीआरएस)**

एफएटीसीए व सीआरएस खाली, आरई, आय कर नियम 114एफ, 114जी व 114एच च्या तरतुदींचे अनुपालन करतील व ठरवितील की त्या, आय कर नियम 114एफ मध्ये व्याख्या केल्यानुसार एक अहवाल पाठविणारी वित्तीय संस्था आहेत काय. आणि तसे असल्यास, रिपोर्टिंग आवश्यकता पूर्ण करण्यास त्या पुढील पाऊले उचलतील.

(अ) https://incometaxindiaefiling.gov.in/post login --> My Account --> Register
ह्या लिंकवर, आय कर विभागाच्या संबंधित ई-फाईलिंग पोर्टलवर, रिपोर्ट करणारी वित्तीय संस्था म्हणून पंजीकरण करतील.

(ब) फॉर्म 61ब किंवा 'निल' रिपोर्ट अपलोड करुन, 'नेमलेल्या संचालकाची' डिजिटल सही वापरुन ऑनलाईन रिपोर्ट्स सादर करावा आणि त्यासाठी, थेट करांचे केंद्रीय मंडळाने (सीबीडीटी) तयार केलेल्या योजनांचा संदर्भ घेतला जावा.

*स्पष्टीकरण :- नियम 114 एच अनुसार कळविण्यालायक खाती ओळखण्यासाठी ड्यु डिलिजन्स कार्यरीत करण्यासाठी, फॉरिन एक्सचेंज डीलर्स असोशिएशन ऑफ इंडिया (एफईडीएआय) ह्यांनी त्यांच्या न्न् वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या स्पॉट रेफरन्स रेट्सचा संदर्भ घ्यावा.*

(क) नियम 114 एचमध्ये दिल्यानुसार, ड्यु डिलिजन्स कार्यरीत करण्यासाठी व ती रेकॉर्ड करुन जतन करुन ठेवण्यासाठी माहिती तंत्रज्ञान (आयटी) साचा विकसित करावा.

(ड) ऑडिट नेटवर्क आणि आय कर नियमावलीच्या नियम 114एफ, 114जी व 114एच च्या अनुपालनाबाबत एक लेखा परीक्षण प्रणाली विकसित करावी.

(ई) अनुपालनाची खात्री करुन घेण्यासाठी, नेमलेला संचालक किंवा अन्य सममूल्य अधिका-याच्याखाली एक 'उच्च स्तरीय देखरेख समिती' स्थापन करावी.

(फ) थेट करांचे केंद्रीय मंडळ (सीबीडीटी) ह्यांनी ह्या विषयावर वेळोवेळी दिलेल्या व त्यांच्या http://www.incometaxindia.gov.in/Pages/default.aspx ह्या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या अद्ययावत सूचना/नियम/मार्गदर्शक टीपा/वृत्तपत्र निवेदने ह्यांचे अनुपालन होत असल्याची खात्री करावी. आरईंनी पुढील गोष्टींची नोंद घ्यावी.

(1) एफएटीसीए व सीआरएस वरील अद्यावत मार्गदर्शन टीपा.

(2) नियम 114एच(8) खालील 'वित्तीय खाती बंद करणे' वरील वृत्तपत्र निवेदन

**(59) प्रदान संलेख सादर करण्यासाठीचा कालावधी**

चेक्स/ड्राफ्ट्स/पेऑर्डर्स/बँकर्स चेक्स, ते दिल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या कालावधीनंतर सादर केले गेल्यास त्यांचे प्रदान केले जाऊ नये.

**(60) बँक खाती व मनी म्युल्सचे परिचलन (ऑपरेशन)**

मनी म्युल्स (म्हणजे पैसा वाहक खेंचरे) म्हणून काम करणा-या तृतीय पक्षांना हाताशी धरुन, ठेवी खात्यांमध्ये बेकायदेशीर घुसखोरी/प्रवेश करणा-या गुन्हेगारांकडून फसवणुकीच्या योजनांचा (उदा. फिशिंग व ओळख चोरी) पैसा सफेद करण्यासाठी 'मनी मुल्स'च्या कार्यकृती कमी करण्यासाठी, खाती उघडणे व व्यवहारांवर देखरेख ठेवणे ह्यावरील सूचनांचे कडक पालन केले जावे. एखादे उघडलेले व चालविण्यात आलेले खाते हे एका मनी म्युलचे आहे असे सिध्द झाल्यास त्या बँकेने ह्या निर्देशांचे पालन केले नसल्याचे समजले जाईल.

**(61) अकाऊंट पेयी चेक्स गोळा करणे**

आदाता ग्राहक (पेयी) सोडून अन्य कोणत्याही व्यक्तीसाठीचे अकाऊंट पेयी चेक्स गोळा केले जाऊ नयेत. बँकांना तसे वाटल्यास, सहकारी सोसायट्या असलेल्या त्यांच्या ग्राहकांच्या खात्याबाबत पन्नास हजार रुपयांपर्यंतचे अकाऊंट पेयी चेक्स गोळा करु शकतात. मात्र, अशा चेक्सचे आदाता अशा सहकारी सोसायट्यांचे घटक असले पाहिजेत.

(62) (अ) बँका व एनबीएफसींनी, त्यांच्या विद्यमान ग्राहकांसह, वैय्यक्तिक ग्राहकांबरोबर नवीन संबंध प्रस्थापित करतेवेळी त्यांना एक युनिक कस्टमर आयडेंटिफिकेशन कोड (युसीआयसी) द्यावा.

(ब) बँका/एनबीएफसी ह्यांना तसे वाटल्यास, पूर्व-प्रदान संलेख खरेदी करणारे/तृतीय पक्षाचे उत्पाद खरेदी करणारे ह्यासारख्या सर्व वॉकइन/प्रासंगिक ग्राहकांना युसीआयसी देणार नाहीत. मात्र त्यासाठी त्यांच्याशी असे व्यवहार वारंवार करणा-या वॉक इन ग्राहकांना ओळखण्याची यंत्रणा त्यांनी ठेवली असल्यास, त्या ग्राहकांनाही युसीआयसी दिला जावा.

**(63) नवीन तंत्रज्ञानाची सुरुवात - क्रेडिट कार्डे/डेबिट कार्डे/स्मार्ट कार्डे/गिफ्ट कार्डे/मोबाईल वॉलेट/नेट बँकिंग/मोबाईल बँकिंग/आरटीजीएस/एनईएफटी/ईसीएस/आयएमपीएस इत्यादि**

नवीन किंवा विकसित होत असलेल्या तंत्रज्ञानांपासून निर्माण होऊ शकणा-या, मनी लॉंडरिंग व दहशतवादी आव्हानांकडे आरईंनी पुरेसे लक्ष द्यावे आणि नवीन उत्पाद/सेवा/तंत्रज्ञाने स्वीकारण्यापूर्वी, वेळोवेळी देण्यात आलेल्या सुयोग्य केवायसी कार्यरीती लागु असल्याबाबत खात्री करुन घेतली जावी. क्रेडिट कार्डांचे विपणन करण्यासाठी वापरण्यात येणा-या एजंटांनाही ड्यु डिलिजन्स व केवायसी उपाय लागु केले जावेत.

**(64) संगत बँक**

बँकांनी, त्यांच्या संचालक मंडळ किंवा अध्यक्ष/सीईओ/एमडी ह्यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून, संगत बँकिंग संबंधीचे पॅरामीटर्स पुढील अटींवर मंजुर केलेले एक धोरण तयार करावे :-

(अ) ह्यासाठी पुढील बाबतीत पुरेशी माहिती गोळा केली जावी. त्या बँकेच्या व्यवसायाचे स्वरुप, तसेच तिचे व्यवस्थापन, प्रमुख व्यवसाय/व्यवहार, एएमएल/सीएफटी अनुपालनाचा स्तर, खाते उघडण्याचा हेतू, त्या संगत बँकेच्या सेवांचा उपयोग करणा-या तृतीय पक्षीय संस्था, आणि त्या बँकेच्या स्वदेशातील विनियामक/पर्यवेक्षणीय साचा

(ब) त्या समितीने मंजुर केलेल्या ठरावांखाली, संचालक मंडळाकडून त्याच्या पुढील सभेत मंजुरी घेतलेली असावी.

(क) संगत बँकिंग संबंध ठेवले गेलेल्या प्रत्येक बँकेच्या जबाबदा-या स्पष्टपणे नोंदून ठेवल्या जाव्यात.

(ड) पेयेबल-थ्रु-अकाऊंट्स बाबत, संगत बँकेने समाधान करुन घ्यावे की, प्रतिवादी बँकेने, त्या खात्यात थेट व्यवहार करु शकणा-या ग्राहकांची ओळख पडताळण्यात आली असून व त्यांचे सातत्याने ड्यु डिलिजन्स केले जात आहे.

(ई) संगत बँक खात्री करुन घेईल की, प्रतिवादी बँक, विनंती केल्यावर, संबंधित ग्राहकाच्या ओळखीबाबतची माहिती त्वरित सादर करु शकेल.

(फ) एखाद्या शेल बँकेबरोबर संगत संबंध ठेवले जाणार नाहीत.

(ग) संगत बँका, त्यांची खाती शेल बँकांकडून वापरली जाण्यास परवानगी देत नाहीत ह्याची खात्री केली जावी.

(ह) डावपेचाच्या त्रुटी असलेल्या, किंवा एफएटीएफ शिफारशींची अंमलबजावणी करण्यात पुरेशी प्रगती न केलेल्या अधिकार क्षेत्रात असलेल्या संगत बँकांबाबत बँका सावधानता ठेवतील.

(आय) बँका खात्री करुन घेतील की, प्रतिवादी बँकांकडे केवायसी/एएमएल धोरणे व कार्यरीती असून, संगत खात्यांद्वारे केल्या जाणा-या व्यवहारांना, वाढीव ड्यु डिलिजन्स रीती लागु करण्यात आल्या आहेत.

**(65) वायर ट्रान्स्फर (तारेने हस्तांतरण)**

वायर ट्रान्स्फर करतेवेळी आरई पुढील गोष्टींची खात्री करुन घेतील.

(अ) क्रेडिट व डेबिट कार्डांचा वापर केलेल्या व्यवहारांसह, सरहद्दीलकडील सर्व वायर ट्रान्स्फर्स बरोबर, बिनचूक व अर्थपूर्ण ओरिजिनेटरची माहिती, जसे, नाव, पत्ता व खाते क्रमांक, किंवा खाते नसल्यास, संबंधित देशात प्रचलित असलेला युनिक रेफरन्स नंबर दिला जाईल.

अपवाद :- जेथे ओरिजिनेटर व लाभार्थी हे दोन्हीही, बँका किंवा वित्त संस्था आहेत, तेथे आंतर-बँकीय हस्तांतरणे व समायोजने ह्यांना वरील आवश्यकतांपासून सूट देण्यात आली आहे.

(ब) रुपये पन्नास हजार व त्यापेक्षा अधिक रकमेच्या देशांतर्गत वायर ट्रान्स्फर्सबरोबर, ओरिजिनेटरची माहिती, जसे, नाव, पत्ता व खाते क्रमांक दिला जाईल.

(क) रिपोर्टिंग किंवा मॉनिटरिंग (देखरेख) टाळण्यासाठी एखादा ग्राहक जाणूनबुजून पन्नास हजार रुपयांपेक्षा कमी रकमेचे वायर ट्रान्स्फर करत असल्यास, अशा ग्राहकाची ओळख पटविली जाईल. ग्राहकाने त्यासाठी असहकार केल्यास, त्याची ओळख पटविण्याचे प्रयत्न केले जातील व एफआययु-आयएनडीकडे एसटीआर दाखल केला जाईल.

(ई) वायर ट्रान्स्फर शृंखलेची एम मध्यस्थ म्हणून प्रक्रिया करणारी बँक खात्री करुन घेईल की, त्या वायर ट्रान्स्फर बरोबर असलेली ओरिजिनेटर माहिती त्या हस्तांतरणासह ठेवली जात आहे.

(फ) प्राप्तकर्ता मध्यस्थ बँक, क्रोस बॉर्डर वायर ट्रान्स्फर बरोबर असलेली ओरिजिनेटरची माहिती हस्तांतरित करील, आणि तांत्रिक मर्यादांमुळे, ती माहिती, संबंधित देशांतर्गत वायर ट्रान्स्फर बरोबर पाठविता न आल्यास, ती किमान पाच वर्षांसाठी जतन करील.

(ग) वायर ट्रान्स्फर ओरिजिनेटरवरील सर्व माहिती, सुयोग्य अशा, कायदे अंमलबजावणी आणि/किंवा न्यायिक प्राधिकरणांकडे, त्यांनी विनंती केल्यावर ताबडतोब उपलब्ध केली जाईल.

(ह) ओरिजिनेटरची संपूर्ण माहितीचा अभाव असलेली वायर ट्रान्स्फर्स ओळखण्यासाठीच्या जोखीम आधारित कार्यकृती, लाभार्थी बँकेकडे असाव्यात.

(आय) ओरिजिनेटरची संपूर्ण माहिती नसलेले व्यवहार, लाभार्थी बँक, एफआययु-आयएनडीकडे, संशयास्पद व्यवहार म्हणून कळवील.

(ज) लाभार्थी बँक, निधी प्रेषण करणा-या संबंधीची सविस्तर माहिती, आदेश देणा-या बँकेकडून मिळवेल आणि आदेश देणा-या बँकेने त्या प्रेषकाची माहिती न दिल्यास, लाभार्थी बँक, त्या आदेश देणा-या बँकेबरोबर वरील व्यावसायिक संबंध निर्बंधित करण्याचा किंवा समाप्त करण्याचा विचार करील.

### (66) डिमांड ड्राफ्ट्स इत्यादी देणे व प्रदान करणे

रुपये पन्नास हजार व त्यावरील रकमेचे, डिमांड ड्राफ्ट, मेल/टेलिग्राफ ट्रान्स्फर/एनईएफटी/आयएमपीएसच्या किंवा अन्यथा मार्फत केलेले निधीचे कोणतेही प्रेषण हे चेक्सने ग्राहकाच्या खात्यात डेबिट करुनच केले जाईल, रोख प्रदानांविरुध्द नव्हे.

ह्याशिवाय, डिमांड ड्राफ्ट, पे ऑर्डर, बँकर्स चेक इत्यादींवर, ते देणा-या बँकेकडून, ते खरेदी करणाराचे नाव लिहिले जाईल. सप्टेंबर 15, 2018 रोजी किंवा त्यानंतर देण्यात येणा-या संलेखांसाठी ह्या सूचना लागु असतील.

### (67)[55]पॅन निर्देशित करणे

बँकांना लागु असलेल्या, वेळोवेळी सुधारित केलेल्या आय कर नियम 114ब अनुसार, व्यवहार करतेवेळी, ग्राहकांचा परमनंट अकाऊंट नंबर (पॅन) किंवा त्याचे सममूल्य ई-डॉक्युमेंट घेतले जावे व त्याची पडताळणी केली जावी. पॅन किंवा त्याचे सममूल्य ई-डॉक्युमेंट नसलेल्या व्यक्तींकडून फॉर्म 60 घेतला जाईल.

### (68) तृतीय पक्षाचे उत्पाद विकणे

जारी असलेल्या व वेळोवेळी असलेल्या विनियमांच्या अनुसार तृतीय पक्षाचे उत्पाद विकताना एजंट म्हणून काम करणा-या आरई, ह्या निर्देशासाठी पुढील बाबींचे अनुपालन करतील.

(अ) ह्या निर्देशांच्या कलम 13(ई) खाली आवश्यक असल्यानुसार, पन्नास हजारांपेक्षा अधिक रकमेचे व्यवहार करणा-या वॉक इन ग्राहकांच्या ओळखीची व पत्त्याची पडताळणी करतील.

(ब) प्रकरण 7, कलम 46 मध्ये विहित केल्यानुसार, तृतीय पक्षाच्या उत्पादांच्या विक्रीचा तपशील आणि संबंधित रेकॉर्ड्स ठेवले जातील.

(क) वॉक इन ग्राहकांसह, तृतीय पक्षीय उत्पादांशी संबंधित व्यवहारांबाबत सीटीआर/एसटीआर दाखल करण्यासाठीचे सावधानतेचे इशारे मिळविणे, निर्माण करणे व त्यांचे विश्लेषण करणे ह्याची क्षमता असलेले एएमएल सॉफ्टवेअर उपलब्ध असतील.

(ड) रुपये पन्नास हजार व त्यापेक्षा अधिक रकमेचे व्यवहार केवळ पुढील प्रकारेच केले जातील :-

- चेक्सच्या विरुध्द खात्याला डेबिट करुन आणि
- वॉक इन तसेच खाते आधारित ग्राहकांकडून पॅन मिळवून आणि त्याची पडताळणी करुन.

(ई) वरील ड मधील सूचना, आरईच्या स्वतःच्या उत्पादांची विक्री, क्रेडिट कार्डाच्या ड्युज् चे प्रदान/प्रिपेड/ट्रॅव्हल कार्डांची आणि रुपये पन्नास हजार व त्यापेक्षा अधिक रकमेच्या अन्य कोणत्याही उत्पादांची विक्री व रिलोडिंग ह्यासाठी लागु असतील.

**(69) सहकारी बँकांना दिलेली अ‍ॅट पार चेक सुविधा**

(अ) वाणिज्य बँकांनी, सहकारी बँकांना दिलेल्या ‘अ‍ॅट पार’ चेक सुविधेवर देखरेख ठेवली जाईल आणि त्यापासून निर्माण होणा-या कर्ज जोखीम व प्रतिष्ठात्मक जोखमीसह, इतर जोखमींचे मूल्यमापन करण्यासाठी, अशा व्यवस्थांचे पुनरावलोकन केले जाईल.

(ब) अशा व्यवस्थाखाली, केवायसी व एएमएल वरील विद्यमान सूचनांचे अनुपालन करण्यासाठी, ग्राहक सहकारी बँका/सोसायट्यांनी ठेवलेल्या रेकॉर्ड्सची पडताळणी करण्याचा हट्ट बँका ठेवतील.

(क) सहकारी बँक पुढील गोष्टी करील.

(1) अ‍ॅट पार सुविधा केवळ पुढील बाबतीतच वापरली जाईल ह्याची खात्री करुन घेतील.

(अ) केवळ त्यांच्याच उपयोगासाठी

(ब) केवायसी अनुपालन केले असलेल्या त्यांच्या ग्राहकांसाठी मात्र, रुपये पन्नास हजार व त्यापेक्षा अधिक रकमेचे सर्व व्यवहार, केवळ ग्राहकाच्या खात्यात डेबिट करुनच केले असावेत.

(क) प्रति व्यक्ती, रु. पन्नास हजारांपेक्षा कमी रोख रकमेच्या विरुध्द वॉक इन ग्राहकांसाठी

(2) पुढील गोष्टी ठेवल्या जाव्यात.

(अ) अ‍ॅट पार चेक्स दिल्याचे रेकॉर्ड, ज्यात अर्जदाराचे नाव व खाते क्रमांक, लाभार्थीचा तपशील व तो अ‍ॅट पार चेक दिल्याची तारीख ह्याबाबतचे रेकॉर्ड.

(ब) अशा संलेखांचे प्रदान करता येण्यासाठी, अशी सुविधा देणा-या वाणिज्य बँकेत पुरेशी शिल्लक/निकासी व्यवस्था.

(3) कितीही रक्कम असली तरी, देण्यात येणारे ‘अ‍ॅट पार’ चेक्स्ड ‘अकाऊंट पेयी’ असल्याची खात्री केली जावी.

(70) **प्रिपेड प्रदान संलेख ( पीपीआय) दिले जाणे**

पीपीआय देणारांनी खात्री करुन घ्यावी की, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या प्रदान व समायोजन प्रणाली विभागाने त्यांच्या महानिर्देशाच्या द्वारे दिलेल्या सूचनांचे अनुसरण काटेकोरपणे करण्यात आले आहे.

**(71) कर्मचारी नोकरीवर ठेवणे व कर्मचारी प्रशिक्षण**

(अ) त्यांच्या कर्मचारी भरती/भाड्याने ठेवण्याच्या प्रक्रियेचा एक मोठा भाग म्हणून, सुयोग्य अशी छाननी प्रक्रिया ठेवली जाईल.

(ब) एएमएल/सीएफटी धोरणाचे पुरेसे प्रशिक्षण कर्मचा-यांना देण्यात येण्यासाठी, सातत्याने कर्मचारी प्रशिक्षण कार्यक्रम ठेवले जातील. फ्रंटलाईन कर्मचारी, अनुपालन करणारे कर्मचारी आणि नवीन ग्राहक हाताळणारे कर्मचारी ह्यांच्यासाठीच्या प्रशिक्षणाचा केंद्रबिंदु निरनिराळा असेल. फ्रंट डेस्क कर्मचा-यांना,

ग्राहक शिक्षणाचा अभाव असल्यामुळे निर्माण झालेले प्रश्न हाताळण्यास खास प्रशिक्षण दिले जाईल. आरईच्या एएमएल/सीएफटीमध्ये धोरणे, विनियम व संबंधित प्रश्न ह्यात निष्णात असलेल्या व सुयोग्यतेने प्रशिक्षित अशा व्यक्ती लेखा तपासणी कार्यासाठी भरती केल्या आहेत ह्याची खात्री केली जावी.

**(72) एनबीएफसी/आरएनबीसी कडून आणि एनबीएफसी/आरएनबीसींची प्राधिकृत केलेल्या व्यक्ती, तसेच दलाल/एजंटांकडून तुमचा ग्राहक जाणा (केवायसी) मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन**

(अ) ठेवी गोळा करण्यासाठी, एनबीएफसी/आरएनबीसींनी प्राधिकृत केलेल्या व्यक्ती आणि त्यांचे दलाल/एजंट्स किंवा तत्सम व्यक्ती ह्यांनी त्या एनबीएफसी/आरएनबीसींना लागु असलेल्या केवायसी मार्गदर्शक तत्वांचे पूर्णपणे पालन केलेले असावे.

(ब) ह्या केवायसी मार्गदर्शक तत्वांच्या अनुपालनाची पडताळणी करण्याबाबतची सर्व माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेला उपलब्ध केली जाईल आणि एनबीएफसी/आरएनबीसींनी प्राधिकृत केलेल्या व्यक्ती व त्यांच्या वतीने काम करणारे दलाल/एजंट्स ह्यांच्याकडून केल्या गेलेल्या कोणत्याही उल्लंघनाच्या परिणामांची जबाबदारी स्वीकारली जाईल.

(क) एनबीएफसी/आरएनबीसीने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती व त्यांचे दलाल/एजंट्स किंवा तत्सम व्यक्ती ह्यांची लेखा पुस्तके (त्या कंपनीच्या दलाली संबंधात असलेली), आवश्यक तेव्हा लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन दिली जातील.

**प्रकरण 11**

## रद्दीकरण तरतुदी

**(73)** हे निर्देश दिले गेले असल्याने, परिशिष्टामधील रिझर्व्ह बँकेने दिलेल्या सूचना/मार्गदर्शक तत्वे रद्द समजली जातील.

**(74)** वरील परिपत्रकांखाली दिलेल्या सर्व मंजु-या/पोचपावत्या ह्या निर्देशांखाली देण्यात आल्या असल्याचे समजले जाईल.

**(75)** रद्द करण्यात आलेली सर्व परिपत्रके, हे निर्देश जारी होण्यापूर्वी जारी असल्याचे समजले जाईल.

### [56]जोडपत्र 1

### डिजिटल केवायसी प्रक्रिया

(अ) डिजिटल केवायसी प्रक्रियेसाठी, आरई एक ॲप्लिकेशन तयार करतील व त्यांच्या ग्राहकांचे केवायसी करण्यासाठी, ते ग्राहक संपर्क केंद्रावर उपलब्ध केले जाईल आणि आरईंच्या ह्या साक्षांकित ॲप्लिकेशनद्वाराच केवायसी प्रक्रिया केली जाईल.

(ब) ह्या ॲप्लिकेशनमध्ये प्रवेश करण्यावर आरईंचे नियंत्रण असेल आणि ते अनधिकृत व्यक्तींकडून वापरले जाणार नाही ह्याची खात्री केली जाईल. ह्या ॲप्लिकेशनमध्ये प्रवेश केवळ, आरईंनी प्राधिकृत अधिका-यांना दिलेल्या लॉग इन-आयडी व पासवर्ड किंवा लाईव्ह ओटीपी किंवा टाईम ओटीपी नियंत्रित यंत्रणांच्या द्वारेच केले जाईल.

(क) केवायसी करण्यासाठी ग्राहक आरईचा प्राधिकृत अधिकारी असलेल्या ठिकाणी किंवा ह्या उलट जाईल. मूळ ओव्हीडी ग्राहकाच्या ताब्यात असतील.

(ड) आरईने खात्री करुन घ्यावी की ग्राहकाचा प्रत्यक्ष फोटोग्राफ प्राधिकृत अधिका-याने घेतला असून, तो फोटो, ग्राहक अर्ज फॉर्मवर (सीएएफ) चिकटविण्यात आला आहे. ह्याशिवाय, त्या आरईचे सिस्टिम ॲप्लिकेशन, ग्राहकाच्या त्या प्रत्यक्ष फोटोवर, सीएएफ क्रमांक, जीपीएस कोऑर्डिनेट्स, प्राधिकृत अधिका-याचे नाव, युनिक एम्पलॉयी कोड (आरईने दिलेला) व तारीख (दिदि मम वर्ष) आणि वेळेचा ठसा (दिदि मम वर्ष), वाचता येण्यासारख्या स्वरुपात असलेला वॉटरमार्क टाकील.

(ई) आरईच्या ॲप्लिकेशनमध्ये असा गुणविशेष/लक्षण असेल की ज्यामुळे ग्राहकाचा प्रत्यक्षातील फोटोच घेतला जाईल व ग्राहकाचा छापील किंवा व्हिडियोवरील फोटो घेतला जाणार नाही. असा फोटो घेतेवेळी ग्राहकाची पार्श्वभूमी पांढ-या रंगाची असावी आणि ग्राहकाचा प्रत्यक्ष फोटो घेतेवेळी अन्य कोणतीही व्यक्ती फ्रेममध्ये येणार नाही.

(फ) त्याचप्रमाणे, जेथे ऑफलाईन पडताळणी करता येऊ शकत नाही तेथे, मूळ ओव्हीडी किंवा आधारकार्ड असल्याचा पुरावा (आडवा/क्षितिज समांतर ठेवून) त्याचा फोटो त्याच्या वरुन/वरच्या बाजूकडून सरळ काढला जाईल आणि वर दिल्यानुसार वाचता येण्याजोग्य स्वरुपात वॉटर मार्किंग केले जाईल. मूळ कागदपत्रांचे प्रत्यक्ष फोटो काढतेवेळी, मोबाईल वाकडा ठेवण्यात येऊ नये.

(ग) ग्राहकाचा व मूळ कागदपत्राचा फोटो स्पष्टपणे वाचता येण्यासारखा व ओळखता येण्याजोगा असावा म्हणून ते फोटो सुयोग्य प्रकाशात घेतले जावेत.

(ह) त्यानंतर, ग्राहकाने दिलेले कागदपत्र व माहितीनुसार, सीएएफमध्ये सर्व एंट्रीज केल्या जाव्यात. ह्या कागदपत्रात क्लिक रिस्पॉन्स (क्युआर) उपलब्ध असल्यास, हाताने तपशील एंटर करण्याऐवजी, असा तपशील केवळ क्युआर फोटो स्कॅनिंग करुन दाखल केला जाऊ शकतो. उदाहरणार्थ, क्युआरकडे उपलब्ध असलेल्या युआयडीएआयमधून प्रत्यक्ष आधार/ई-आधार डाऊनलोड करण्यासाठी, नाव, लिंग, जन्मतारीख व पत्ता ह्यासारखा तपशील, त्या आधार/ई-आधारवरील क्युआरचे स्कॅनिंग करुन दाखल केला जाऊ शकतो.

(आय) वरील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, ओटीपी शेअर करण्यापूर्वी, कृपया फॉर्ममध्ये भरलेला तपशील तपासून पहावा. हा मजकुर असलेला वनटाईम पासवर्ड (ओटीपी) ग्राहकाच्या स्वतःच्या मोबाईल नंबरवर पाठविला जाईल. ह्या ओटीपीचे यशस्वी साक्षांकन झाल्यावर, ते सीएएफवरील ग्राहकाची सही समजले जाईल. तथापि, ग्राहकाकडे त्याचा/तिचा स्वतःचा मोबाईल क्रमांक नसल्यास त्याचे/तिचे कुटुंब/नातेवाईक/ओळखीच्या व्यक्ती ह्यांचा मोबाईल क्रमांक ह्यासाठी वापरला जाईल व सीएएफमध्ये तसे स्पष्टपणे निर्देशित केले जाईल. कोणत्याही परिस्थितीत, ग्राहकाच्या सहीसाठी, प्राधिकृत अधिका-याचा आरईकडे पंजीकृत मोबाईल क्रमांक वापरला जाऊ नये. ग्राहकाच्या सहीमध्ये वापरण्यात आलेला मोबाईल क्रमांक हा प्राधिकृत अधिका-याचा मोबाईल क्रमांक नसल्याची खात्री आरईने करुन घ्यावी.

(जे) ग्राहक व मूळ कागदपत्रांचे प्रत्यक्ष फोटो असल्याबाबत, प्राधिकृत अधिकारी एक घोषणापत्र देईल. ह्यासाठी, आरईकडे पंजीकृत केलेल्या त्याच्या मोबाईल क्रमांकावर वन टाईम पासवर्ड (ओटीपी) ने प्राधिकृत अधिका-याचे सत्यांकन केले जाईल. हे सत्यांकन यशस्वी झाल्यावर, ते त्या प्राधिकृत अधिका-याच्या घोषणापत्रावरील त्याची सही समजले जाईल. प्राधिकृत अधिका-याच्या ह्या घोषणापत्रामध्ये त्या प्राधिकृत अधिका-याचा प्रत्यक्ष फोटोही घेतला जाईल.

(के) ह्या सर्व कार्यकृतींनंतर, ते ॲप्लिकेशन, ही प्रक्रिया पूर्ण झाल्याबाबत माहिती देईल व त्या आरईच्या ॲक्टिवेशन अधिका-याला ॲक्टिवेशन करण्याची विनंती करील आणि ह्या प्रक्रियेचा ट्रँझॅक्शन आयडी/रेफरन्स आयडी क्रमांकही निर्माण करील. प्राधिकृत अधिकारी, भविष्यातील संदर्भासाठी, ग्राहकाला, ट्रँझॅक्शन-आयडी/रेफरन्स आयडी क्रमांकाचा तपशील कळवील.

(ल) आरईचा प्राधिकृत अधिकारी तपासणी करुन पडताळणी करील की :- (1) कागदपत्राच्या फोटोत दिलेली माहिती, प्राधिकृत अधिका-याने सीएएफमध्ये एंटर केलेल्या माहितीशी जुळणारी आहे. (2) ग्राहकाचा प्रत्यक्ष काढलेला फोटो, कागदपत्रात दिलेल्या फोटोशी जुळणारा आहे. आणि (3) अनिवार्य क्षेत्रासह सीएएफमधील सर्व आवश्यक तपशील सुयोग्यपणे फाईल करण्यात आला आहे.

(म) यशस्वी पडताळणीनंतर, आरईच्या प्राधिकृत अधिका-याकडून त्या सीएएफवर सही केली जाईल व तो अधिकारी, त्या सीएफचा एक प्रिंट घेईल, त्यावर योग्य जागी ग्राहकाची सही/अंगठ्याचा ठसा घेईल आणि तो स्कॅन करुन सिस्टिममध्ये अपलोड करील. मूळ हार्ड कॉपी ग्राहकाला परत दिली जाऊ शकते.

ह्या प्रक्रियेसाठी बँका बिझिनेस कॉरेस्पाँडंटच्या (बीसी) सेवा येऊ शकतात.

**जोडपत्र 2**

## फाईल क्रमांक.14014/01/2019/सीएफटी

**भारत सरकार**

**गृह व्यवहार मंत्रालय**

**सीटीसीआर विभाग**

नवी दिल्ली, दिनांक 14 मार्च, 2019

**<u>आदेश</u>**

**विषय :- बेकायदेशीर कार्यकृती (प्रतिबंध) अधिनियम, 1967 च्या कलम 51अ ची अंमलबजावणी**

बेकायदेशीर कार्यकृती (प्रतिबंध) अधिनियम, 1967 (युएपीए) सुधारित केला जाऊन, 31-12-2008 रोजी अधिसूचित करण्यात आला आणि त्यात कलम 51 अ घालण्यात आले. कलम 51 अ पुढीलप्रमाणे आहे :

51अ दहशतवादी कार्यकृतींना प्रतिबंध करण्यासाठी व त्यांचा सामना करण्यासाठी, कैंद्र सरकारकडे पुढील अधिकार असतील.

(अ) ह्या आदेशाच्या शेड्युलमधील यादीत असलेल्या व्यक्ती किंवा संस्था, किंवा दहशतवाद करत असलेल्या किंवा तसा संशय असलेल्या, किंवा त्यांच्या वतीने किंवा निर्देशाने काम करत असलेल्या व्यक्तींचे निधी व इतर वित्तीय मत्ता किंवा आर्थिक स्त्रोत गोठविणे, ताब्यात घेणे किंवा जप्त करणे.

(ब) ह्या आदेशाच्या शेड्युल मधील यादीत असलेल्या व्यक्ती किंवा संस्था किंवा दहशतवाद करत असलेल्या किंवा तसा संशय असलेल्या व्यक्तींच्या लाभासाठी, कोणतेही निधी, वित्तीय मालमत्ता किंवा आर्थिक स्त्रोत तयार करण्यास/ठेवण्यास किंवा संबंधित सेवा उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला प्रतिबंध करणे.

(क) ह्या आदेशाच्या शेड्युलमधील यादीत व्यक्ती किंवा दहशतवाद करणा-या किंवा तसा संशय असलेल्या व्यक्ती ह्यांना भारतात प्रवेश करण्यास किंवा संक्रमण करण्यास प्रतिबंध करणे.

बेकायदेशीर कार्यकृती (प्रतिबंध) अधिनियम, 1967 मधील व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

'आदेश' म्हणजे, वेळोवेळी सुधारित केलेला, दहशतवादाचा प्रतिबंध व दमन (सुरक्षा मंडळाच्या ठरावांची अंमलबजावणी) आदेश, 2007.

कलम 51 अ च्या तरतुदींची अंमलबजावणी जलद व परिणामकारकतेने करण्यासाठी ह्या मंत्रालयाचा आदेश क्र. 17015/10/2002-आयएस-VI दि. 27-08-2009 अन्वये एक कार्यरीत ठरविण्यात आली. गृह व्यवहार मंत्रालयातील विभागांची पुनर्रचना केली गेल्यावर, बेकायदेशीर कार्यकृती (प्रतिबंध) अधिनियम, 1967 चे प्रशासन आणि

दहशतवादाला वित्त पुरवठा करण्याचा सामना ह्याबाबतचे कार्य सीटीसीआर विभागाकडे सोपविण्यात आले. त्यानुसार, दि. 27-08-2009 चा आदेश पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात आला आहे.

**युएपीए नोडल अधिका-यांची नेमणुक व संपर्क तपशील**

(2) युएपीए नोडल अधिका-यांची नेमणुक व संपर्क तपशील ह्याबाबत :-

(1) सीटीसीआर विभागाचा नोडल अधिकारी हा संयुक्त सचिव (सीटीसीआर), गृह व्यवहार मंत्रालय असेल. त्याचा संपर्क तपशील म्हणजे, 011-23092736, 011-23092569 (फॅक्स) व jsctcr-mha@gov.in (ई-मेल आयडी).

(2) बाह्य व्यवहार मंत्रालय, आर्थिक व्यवहार विभाग, एमएचएचा विदेशी व्यक्ती विभाग, एफआययु - आयएमडी, आणि आरबीआय, सेबी, आयआरडीए (ह्यांना ह्यापुढे विनियामक म्हटले आहे) मिळून एका युएपीए नोडल अधिका-याची नेमणुक करतील व त्याचे नाव व संपर्क तपशील, एमएचएमधील सीटीसीआर विभागाला कळवितील.

(3) राज्ये आणि युटी ह्यांची शक्यतो, प्रधान सचिव/सचिव, गृह विभाग ह्या व जीचा युएपीए नोडल अधिकारी नेमला आणि त्याचे नाव व संपर्क तपशील एमएचएच्या सीटीसीआर विभागाला कळवावा.

(4) एमएचएमधील सीटीआर विभाग, सर्व युएपीए नोडल अधिका-यांची एक एकत्रित केलेली यादी ठेवील आणि ती यादी इतर सर्व युएपीए नोडल अधिका-यांकडे पाठवील.

(5) आरबीआय, सेबी, आयआरडीए ह्यांनी, युएपीए नोडल अधिका-यांची एकत्रित केलेली यादी अनुक्रमे, बँका, स्टॉक एक्सचेंजेस/डिपॉझिटरीज, सेबीकडून विनियमित केलेल्या मध्यस्थ संस्था व विमा कंपन्या ह्यांना पाठवावी.

(6) युएपीए नोडल अधिका-यांची एकत्रिकृत यादी, एमएचएच्या सीटीसीआर विभागाने दर वर्षी जुलै महिन्यात व त्यात प्रत्येक बदल झाल्यावर प्रसारित करावी. संयुक्त सचिव (सीटीसीआर) हा, एमएचएचा सीटीसीआर विभागाचा नोडल अधिकारी असल्याने, तो, युएपीए नोडल अधिका-यांची सुधारित यादी, बाह्य व्यवहार मंत्रालय, आर्थिक व्यवहार विभाग, एमएचएचा विदेशी व्यक्ती विभाग, आरबीआय, सेबी, आयआरडीए व एफआययु - आयएनडी ह्यांच्या नोडल अधिका-यांकडे प्रसारित करील.

**नेमलेल्या व्यक्ती/संस्थांची यादी कळविणे**

(3) नेमलेल्या व्यक्ती/संस्थांची यादी कळविण्याबाबत :-

(1) बाह्य व्यवहार मंत्रालय, युएन मंजुरीच्या अटीवर, व्यक्ती व संस्थांची यादी नियमितपणे अद्यावत करतील. त्यात काही बदल/सुधारणा झाल्यास, बाह्य व्यवहार मंत्रालय ती यादी इलेक्ट्रॉनिक रितीने, विनियामक एफआययु - आयएमडी, एमएचएमधील सीटीसीआर विभाग व विदेशी व्यक्ती विभाग ह्यांच्या नोडल अधिका-यांकडे पाठवील.

(2) वरील (1) मध्ये निर्देशित केलेली यादी (ह्यापुढे तिला डेसिग्नेटेड लिस्ट म्हटले आहे) विनियामकांकडून अनुक्रमे, बँका, स्टॉक एक्सचेंजेस/डिपॉझिटरीज् सेबीकडून विनियमित केलेल्या मध्यस्थ संस्था व विमा कंपन्यांना पाठविली जाईल.

(3) एमएचएचा सीटीसीआर विभाग ह्या डेसिग्नेटेड लिस्ट, सर्व राज्यांच्या व युटींच्या युएपीए नोडल अधिका-यांकडे पाठवील.

(4) एमएचएचा विदेशी व्यक्ती विभाग, ह्या डेसिग्नेटेड लिस्ट, इमायग्रेशन प्राधिकरणे व सुरक्षा एजन्सींकडे पाठवील.

**बँक खाती, स्टॉक्स किंवा विमा पॉलिसी इत्यादींच्या स्वरुपात ठेवलेले निधी, वित्तीय मत्ता किंवा आर्थिक स्त्रोत किंवा संबंधित सेवा ह्याबाबत**

(4) बँक खाती, स्टॉक्स किंवा विमा पॉलिसी इत्यादींच्या स्वरुपात ठेवलेले निधी, वित्तीय मत्ता किंवा आर्थिक स्त्रोत किंवा संबंधित सेवा ह्याबाबत वरील (1) मध्ये निर्देशित केलेली यादी (ह्यापुढे तिला डेसिग्नेटेड लिस्ट म्हटले आहे) विनियामकांकडून अनुक्रमे, बँका, स्टॉक एक्सचेंजेस/डिपॉझिटरीज् सेबीकडून विनियमित केलेल्या मध्यस्थ संस्था व विमा कंपन्यांना पाठविली जाईल. आरबीआय, सेबी व आयआरडीए कडून बँका, स्टॉक एक्सचेंजेस/डिपॉझिटरीज् सेबीकडून विनियमित मध्यस्थ, संस्था आणि विमा कंपन्या ह्यांना आवश्यक ती मार्गदर्शक तत्वे दिली जातील व त्यांना पुढील गोष्टी करणे आवश्यक असेल :-

(1) अद्यावत केलेल्या डेसिग्नेटेड लिस्ट्स इलेक्ट्रॉनिक स्वरुपात ठेवण्यात आणि ह्या आदेशाच्या शेड्युलमधील यादीत असलेल्या व्यक्ती किंवा संस्था (ह्यापुढे ह्यांना डेसिग्नेटेड व्यक्ती/संस्था असे म्हटले आहे) ह्यांनी बँक खाती, स्टॉक्स किंवा विमा पॉलिसी इत्यादींच्या स्वरुपात, त्यांचेकडे कोणतेही निधी, वित्तीय मत्ता किंवा आर्थिक स्त्रोत किंवा संबंधित सेवा ठेवल्या आहेत काय ह्याची पडताळणी करण्यासाठी, देण्यात आलेल्या पॅरामीटर्सवर नियमितपणे तपासणी करावी.

(2) त्यांच्या काही ग्राहकांचा तपशील/माहिती, डेसिग्नेटेड व्यक्ती/संस्थांच्या तपशीलाशी जुळत असल्यास, बँका, स्टॉक एक्सचेंजेस/डिपॉझिटरीज् सेबीने विनियमित केलेल्या मध्यस्थ संस्था आणि विमा कंपन्या ह्यांनी ताबडतोब, असा ग्राहक आढळून आल्यापासून 24 तासांच्या आत, अशा ग्राहकाने, त्यांच्या पुस्तकांमध्ये, बँक खाती, स्टॉक्स किंवा विमा पॉलिसी इत्यादींच्या स्वरुपात ठेवलेले निधी, वित्तीय मत्ता, किंवा आर्थिक स्त्रोत किंवा संबंधित सेवा ह्यांची संपूर्ण माहिती संयुक्त सचिव (सीटीआर), गृह व्यवहार, मंत्रालय ह्यांना 011-23092569 ह्या फॅक्सवर आणि 011-23092736. ह्या टेलिफोन क्रमांकावरही कळवावी. हा तपशील पोस्टाने पाठविण्याव्यतिरिक्त, jsctcr-mha@gov.in ह्यावर ई-मेलनेही पाठविणे आवश्यक आहे.

(3) बँका, स्टॉक एक्सचेंजेस/डिपॉझिटरीज् सेबीकडून विनियमित मध्यस्थ संस्था व विमा कंपन्या, वरील (2) मध्ये दिलेल्या माहितीची एक प्रत, ते खाते ठेवण्यात आलेल्या राज्य/युटी ह्यांच्या युएपीए नोडल अधिका-यांकडे व विनियमाकडे आणि एफआययु - आयएनडी कडेही असेल त्यानुसार पाठवितील.

(4) कोणत्याही ग्राहकाची माहिती, डेसिग्नेटेड व्यक्ती/संस्थांच्या तपशीलाशी निःसंशयपणे जुळत असल्यास, बँका, स्टॉक एक्सचेंजेस/डिपॉझिटरीज्, सेबीकडून विनियमित मध्यस्थ संस्था व विमा कंपन्या, ती बाब, संयुक्त सचिव

(सीटीसीआर), गृह व्यवहार मंत्रालय ह्यांना 011-23092569 फॅक्स क्रमांकावर 011-23092736. ह्या टेलिफोने क्रमांकावर कळवून त्या डेसिग्नेटेड व्यक्तींना वित्तीय व्यवहार करण्यास प्रतिबंध करतील. हा तपशील पोस्टाने पाठविण्याव्यतिरिक्त jsctcr-mha@gov.in वर ई-मेलनेही पाठविला जावा.
(5) बँका, स्टॉक एक्सचेंजेस/डिपॉझिटरीज्, सेबीकडून विनियमित मध्यस्थ संस्था व विमा कंपन्या, त्या खात्यांमध्ये केलेल्या किंवा तसा प्रयत्न केलेल्या, वरील परिच्छेद (2) मध्ये दिलेल्या सर्व व्यवहारांची माहिती, विहित केलेल्या नमुन्यानुसार भरुन एक संशयास्पद व्यवहार रिपोर्ट (एसटीआर), एफआययु - आयएनडीकडे दाखल करतील.

